Exh. 21

## नेवासा येथील मे. सिव्हिल जज्ज साहेब, ज्यु.डी.

यांचे कोर्टात

रे.मु.नं.

२०९/२०२५

वादी

अनिल हेमराज भळगट

प्रतिवादी

धनराज जसराज भळगट, वगैरे




याकामी प्र.वादी नं.१ ते ३ तर्फे सि.पि.सि.ऑर्डर ७ रुल ११ प्रमाणे असे तो खालीलप्रमाणे -

१. सदरचा दावा वादीने प्रतिवादीविरुध्द निरंतर ताकीद मनाई हुकूमासाठी व जाहिर ठरावासाठी दाखल केलेला आहे. प्रतिवादी यांनी दाव्यात कैफियत दाखल केलेली आहे.

२. प्रस्तुत दाव्यामध्ये वादी यांनी प्रतिवादी विरुध्द खोटी, कपोलकल्पीत अशी कथने करुन प्रस्तुतचा दावा दाखल केलेला आहे. प्रस्तुत दाव्यामध्ये वादीने दावा मिळकत कलम १ब मध्ये नमुद केलेली दावा मिळकत मौजे सोनई,ता.नेवासा येथील गट नं.५८३/२/ब, क्षेत्र २ हे.५३ आर ही दावा मिळकत प्रतिवादी नं.१ यांचे मालकी हक्क कब्जेवहिवाटीची होती व आहे. प्रतिवादी नं.१ व वादीचे वडील हेमराज यांचे दरम्यान मुळ गट नं.५८३ मध्ये मो.र.नं.१८४/२०१७,ता.१०/०२/२०१७ रोजी मा.भुमि उपअधिक्षक, नेवासा यांचेकडे कायदेशिररित्या सहमतीने अर्ज करुन फाळणी बाराची कायदेशिर कार्यवाही होवून स्वतंत्र असे ग.नं.५८३/२/अ व ग.नं.५८३/२/ब असे स्वतंत्र हिस्से निर्माण झालेले आहेत, तेंव्हापासून वादीची

Order

-----------------------------

Other side to say

SANDHYA YUVRAJ SUL
Digitally signed by SANDHYA YUVRAJ SUL
Date: 2025.05.23 18:35:19 +0530

2nd, Jt. CJJD, Newasa

ग.नं.५८३/२/अ, क्षेत्र २ हे.५३ आर व प्रतिवादी नं.१ यांची गट नं.५८३/२/ब, क्षेत्र २ हे.५३ आर या प्रमाणे स्वतंत्र वहिवाट आहे.

३. वादीने दाखल केलेल्या सदरच्या दाव्यास व मनाई हुकूमाचे अर्जास या प्रतिवादीं विरुध्द कोणतेही कॉझ ऑफ ॲक्शन डिसक्लोज होवू शकत नाही. तसेच सदर वादी यांनी मे.न्यायालयामध्ये याच दावा मिळकतीबाबत रे.मु.नं.१०७६/२०२४ चा दावा प्र.वादी नं.१ यांचे विरुध्द व प्र.वादी नं.२ व ३ यांचे पती अनुक्रमे एकनाथ केरु वांढेकर व आण्णासाहेब रामदास आदमाने यांचे विरुध्द दाखल केलेला होता, तसेच त्या दाव्यामध्ये प्र.वादी नं.४ हीस देखील समाविष्ट केलेले आहे. सदरचा दावा हा मे.न्यायालयामध्ये दाखल असुन तो दावा आजही मा.न्यायालया समोर प्रलंबित आहे. प्रस्तुत दाव्यामध्ये वादीस मे.कोर्टा मार्फत कुठलाही रिलीफ मिळालेला नसल्यामुळे प्रस्तुत वादीने पुन्हा खोटे नविन कॉज ऑफ ॲक्शन दाखवुन प्रस्तुतचा दावा मा.न्यायालयात दाखल केलेला आहे. त्यामुळे प्रस्तुतच्या दाव्यास रेस-ज्युडिकेट्टा ची बाधा निर्माण होत असल्यामुळे प्रस्तुतचा दावा आणि मनाई हुकूमाचा अर्ज सिव्हिल प्रोसिजर कोडच्या ऑर्डर ७ रुल ११अ प्रमाणे रद्द होण्यास पात्र आहे.

४. तसेच प्रस्तुतचा वादी हा वेगवेगळ्या थेरी/ कपोलकल्पीत खोटी कथने करुन वेगवेगळे दावे या प्रतिवादी विरुध्द दाखल करत आहेत, त्यामुळे Mulitiplilty of Suit निर्माण होवून कायदेशिर गुंतागुंत निर्माण होणार आहे. त्यामुळे वादीचा दावा रद्द होण्यास पात्र आहे. वादीस एकाच मिळकतीबाबत व एकाच प्रतिवादी विरुध्द वेगवेगळे दावे दाखल करुन वेगवेगळे रिलीफ मागता येणार नाही.

५. वादीस सदरचा दावा दाखल करण्यासाठी कायद्याने आवश्यक असणारी लोकस स्टॅंडी (locus-standy) नव्हती व नाही, कारण वादी हे दावा मिळकतीची मालक नाहीत अगर त्यांचा दावा मिळकतीशी काही एक संबंध नाही. वादीस दावा

मिळकतीचे कुठल्याही प्रकारचे टायटल व पझेशन नव्हते व नाही, असण्याचे काही एक कारण नाही.

६. वादीने दाव्यास योग्य तो कोर्ट फि स्टॅम्प लावलेला नसल्याने वादीचा दावा रद्द होण्यास पात्र आहे.

७. प्रस्तुत वादीने सदरच्या दाव्यामध्ये विनंती पॅरा नं.३ मध्ये मो.र.नं.१८४/२०१७ चे केलेली फाळणी बेकायदेशिर ठरवुण मिळण्याची मागणी केलेली आहे. वास्तविक पाहता सदरची झालेली गट विभागणी फाळणी ही उपअधिक्षक भुमिअभिलेख नेवासा यांनी कायदेशिररित्या संपुर्ण प्रक्रिया पुर्ण करुन केलेली आहे. प्रस्तुतची फाळणी रद्द करण्यासाठी या मे.कोर्टास Teretorial Jurisdiction नाही. सदरचा अधिकार हा मा.जिल्हा अधिक्षक भुमिअभिलेख यांना आहे. त्यामुळे वादीने केलेली मागणी कायदेशिर नाही.

८. तसेच वादी यांनी मो.र.नं.१८४/२०१७ रद्द करण्याची मागणी केलेली असल्यामुळे वादीने तालुका उपअधिक्षक भुमिअभिलेख नेवासा यांना तसेच महसुली शासकीय अधिकारी यांना दाव्यात समाविष्ट केलेले नाही, त्यामुळे प्रस्तुतच्या दाव्यास नेसेसरीज् पार्टीज चा बाध निर्माण होत आहे. तसेच सदरचा मो.र.नं.१८४/२०१७, ता.१०/०२/२०१७ रोजी अन्वये झालेली फाळणी रद्द करण्याची मागणी वादीने दावा कलम १३ड मध्ये केलेली आहे, ती मागणी कायदयानुसार तीन वर्षाच्या आत करणे आवश्यक होते परंतु ती मुदतीत नाही, त्यामुळे मुदतीचे कायदयाचा बाधा निर्माण होत असल्याने वादीचा दावा रद्द होण्यास पात्र आहे.

९. वादीने सदरच्या दाव्यामध्ये प्र.वादी नं.१ ने प्र.वादी नं.२ व ३ यांना दावा मिळकत १ब - ग.नं.५८३/२/ब , क्षेत्र २ हे.५३ आर ही संपुर्ण मिळकत कायमखरेदीखत दस्त नं.३३४/२०२५ अन्वये रक्कम रु.१७,७५,०००/- व दुसरे खरेदीखत दस्त क्रं.३३५/२०२५ अन्वये रक्कम रु.१७,७५,०००/- स विक्री केलेली आहे. अशी

दावा मिळकतीची एकुण किंमत रक्कम रु.३५,५०,०००/- एवढी आहे. वादीने दोन्ही खरेदीखते चॅलेज केलेली आहेत. वादीने दाव्याची किंमत केवळ रुपये २०००/- करुन त्यावर स्टॅम्प लावलेला आहे. वास्तविक पाहता मुंबई कोर्ट फि ॲक्ट मधील तरतुदीनुसार खरेदीखत रक्कम रु.३५,५०,०००/- रक्कमेवर आवश्यक तो कोर्ट फि स्टॅम्प दाव्यास लावलेला नाही.

१०.ना.मुंबई उच्च न्यायालयाचे 2022 (4) Mh LJ Page No.130 चे निवाडयानुसार वादीने वरील रक्कमेप्रमाणे दाव्याची किंमत करुन त्यावर स्टॅम्प लावणे आवश्यक आहे. वादीने त्याप्रमाणे पुर्तता केलेली नाही व स्टॅम्प लावलेला नाही. वादीचा दावा सि.पि.सि.ऑर्डर ७ रुल ११ प्रमाणे वेगवेगळे कायदयातील तरतुदीप्रमाणे बाधा निर्माण होत असल्याने वादीचा दावा रद्द होण्यास पात्र आहे.

११.तरी मे.कोर्टास नम्र विनंती की,

वरील कारणास्तव वादीचा दावा Barred By Any Law असल्यामुळे सि.पि.सि.ऑर्डर ७ रुल ११ प्रमाणे रद्द करण्यात यावा, ही विनंती.

सोबत ॲफिडेव्हिट दिले आहे. अर्ज मंजुर व्हावा ही विनंती.

नेवासा

दिनांक :२३/०५/२०२५

१.

२.

३.

प्र.वादी नं.१ ते ३

प्र.वादीतर्फे ॲड.

(ॲड.एस.बी.लवांडे)

Exh. 22

# //ॲफिडेव्हिट//

**नेवासा येथील मे. सिव्हिल जज्ज साहेब, ज्यु.डी.**

यांचे कोर्टात

**रे.मु.नं.**

२०९/२०२५

**वादी**

अनिल हेमराज भळगट

**प्रतिवादी**

धनराज जसराज भळगट, वगैरे

**याकामी मी धनराज जसराज भळगट, वय-७६, धंदा-शेती, रा.सोनई, ता.नेवासा, जि.अ.नगर सत्यप्रतिज्ञेवर ॲफिडेव्हिट करतो की,**

१. सदरचा दावा वादीने प्रतिवादीविरुध्द निरंतर ताकीद मनाई हुकूमासाठी व जाहिर ठरावासाठी दाखल केलेला आहे. प्रतिवादी यांनी दाव्यात कैफियत दाखल केलेली आहे.

२. प्रस्तुत दाव्यामध्ये वादी यांनी प्रतिवादी विरुध्द खोटी, कपोलकल्पीत अशी कथने करुन प्रस्तुतचा दावा दाखल केलेला आहे. प्रस्तुत दाव्यामध्ये वादीने दावा मिळकत कलम १ब मध्ये नमुद केलेली दावा मिळकत मौजे सोनई,ता.नेवासा येथील गट नं.५८३/२/ब, क्षेत्र २ हे.५३ आर ही दावा मिळकत प्रतिवादी नं.१ यांचे मालकी हक्क कब्जेवहिवाटीची होती व आहे. प्रतिवादी नं.१ व वादीचे वडील हेमराज यांचे दरम्यान मुळ गट नं.५८३ मध्ये मो.र.नं.१८४/२०१७,ता.१०/०२/२०१७ रोजी मा.भुमि उपअधिक्षक, नेवासा यांचेकडे कायदेशिरित्या सहमतीने अर्ज करुन फाळणी बाराची कायदेशिर कार्यवाही होवून स्वतंत्र असे ग.नं.५८३/२/अ व

Order

-----------------------------

Seen & Filed

SANDHYA YUVRAJ SUL

Digitally signed by SANDHYA YUVRAJ SUL
Date: 2025.05.23 18:35:29 +0530

2nd, Jt. CJJD, Newasa

Assistant Superintendent
Criminal Court Newasa

ग.नं.५८३/२/ब असे स्वतंत्र हिस्से निर्माण झालेले आहेत, तेंव्हापासून वादीची ग.नं.५८३/२/अ, क्षेत्र २ हे.५३ आर व प्रतिवादी नं.१ यांची गट नं.५८३/२/ब, क्षेत्र २ हे.५३ आर या प्रमाणे स्वतंत्र वहिवाट आहे.

३. वादीने दाखल केलेल्या सदरच्या दाव्यास व मनाई हुकूमाचे अर्जास या प्रतिवादीं विरुध्द कोणतेही कॉझ ऑफ ॲक्शन डिसक्लोज होवू शकत नाही. तसेच सदर वादी यांनी मे.न्यायालयामध्ये याच दावा मिळकतीबाबत रे.मु.नं.१०७६/२०२४ चा दावा प्र.वादी नं.१ यांचे विरुध्द व प्र.वादी नं.२ व ३ यांचे पती अनुक्रमे एकनाथ केरु वांढेकर व आण्णासाहेब रामदास आदमाने यांचे विरुध्द दाखल केलेला होता, तसेच त्या दाव्यामध्ये प्र.वादी नं.४ हीस देखील समाविष्ट केलेले आहे. सदरचा दावा हा मे.न्यायालयामध्ये दाखल असुन तो दावा आजही मा.न्यायालया समोर प्रलंबित आहे. प्रस्तुत दाव्यामध्ये वादीस मे.कोर्टा मार्फत कुठलाही रिलीफ मिळालेला नसल्यामुळे प्रस्तुत वादीने पुन्हा खोटे नविन कॉज ऑफ ॲक्शन दाखवुन प्रस्तुतचा दावा मा.न्यायालयात दाखल केलेला आहे. त्यामुळे प्रस्तुतच्या दाव्यास **रेस-ज्युडिकेट्टा** ची बाधा निर्माण होत असल्यामुळे प्रस्तुतचा दावा आणि मनाई हुकूमाचा अर्ज सिव्हिल प्रोसिजर कोडच्या ऑर्डर ७ रुल ११अ प्रमाणे रद्द होण्यास पात्र आहे.

४. तसेच प्रस्तुतचा वादी हा वेगवेगळया थेरी/ कपोलकल्पीत खोटी कथने करुन वेगवेगळे दावे या प्रतिवादी विरुध्द दाखल करत आहेत, त्यामुळे Mulitiplilty of Suit निर्माण होवून कायदेशिर गुंतागुंत निर्माण होणार आहे. त्यामुळे वादीचा दावा रद्द होण्यास पात्र आहे. वादीस एकाच मिळकतीबाबत व एकाच प्रतिवादी विरुध्द वेगवेगळे दावे दाखल करुन वेगवेगळे रिलीफ मागता येणार नाही.

५. वादीस सदरचा दावा दाखल करण्यासाठी कायद्याने आवश्यक असणारी लोकस स्टँडी (locus-standy) नव्हती व नाही, कारण वादी हे दावा मिळकतीची मालक नाहीत अगर त्यांचा दावा मिळकतीशी काही एक संबंध नाही. वादीस दावा मिळकतीचे कुठल्याही प्रकारचे टायटल व पझेशन नव्हते व नाही, असण्याचे काही एक कारण नाही.

६. वादीने दाव्यास योग्य तो कोर्ट फि स्टॅम्प लावलेला नसल्याने वादीचा दावा रद्द होण्यास पात्र आहे.

७. प्रस्तुत वादीने सदरच्या दाव्यामध्ये विनंती पॅरा नं.३ मध्ये मो.र.नं.१८४/२०१७ चे केलेली फाळणी बेकायदेशिर ठरवुण मिळण्याची मागणी केलेली आहे. वास्तविक पाहता सदरची झालेली गट विभागणी फाळणी ही उपअधिक्षक भुमिअभिलेख नेवासा यांनी कायदेशिररित्या संपुर्ण प्रक्रिया पुर्ण करुन केलेली आहे. प्रस्तुतची फाळणी रद्द करण्यासाठी या मे.कोर्टास Teretorial Jurisdiction नाही. सदरचा अधिकार हा मा.जिल्हा अधिक्षक भुमिअभिलेख यांना आहे. त्यामुळे वादीने केलेली मागणी कायदेशिर नाही.

८. तसेच वादी यांनी मो.र.नं.१८४/२०१७ रद्द करण्याची मागणी केलेली असल्यामुळे वादीने तालुका उपअधिक्षक भुमिअभिलेख नेवासा यांना तसेच महसुली शासकीय अधिकारी यांना दाव्यात समाविष्ट केलेले नाही, त्यामुळे प्रस्तुतच्या दाव्यास नेसेसरीज् पार्टीज चा बाध निर्माण होत आहे. तसेच सदरचा मो.र.नं.१८४/२०१७, ता.१०/०२/२०१७ रोजी अन्वये झालेली फाळणी रद्द करण्याची मागणी वादीने दावा कलम १३ड मध्ये केलेली आहे, ती मागणी कायदयानुसार तीन वर्षाच्या आत करणे आवश्यक होते परंतु ती मुदतीत नाही, त्यामुळे मुदतीचे कायदयाचा बाधा निर्माण होत असल्याने वादीचा दावा रद्द होण्यास पात्र आहे.

९. वादीने सदरच्या दाव्यामध्ये प्र.वादी नं.१ ने प्र.वादी नं.२ व ३ यांना दावा मिळकत १ब - ग.नं.५८३/२/ब , क्षेत्र २ हे.५३ आर ही संपुर्ण मिळकत कायमखरेदीखत दस्त नं.३३४/२०२५ अन्वये रक्कम रु.१७,७५,०००/- व दुसरे खरेदीखत दस्त क्रं.३३५/२०२५ अन्वये रक्कम रु.१७,७५,०००/- स विक्री केलेली आहे. अशी दावा मिळकतीची एकुण किंमत रक्कम रु.३५,५०,०००/- एवढी आहे. वादीने दोन्ही खरेदीखते चॅलेज केलेली आहेत. वादीने दाव्याची किंमत केवळ रुपये २०००/- करुन त्यावर स्टॅम्प लावलेला आहे. वास्तविक पाहता मुंबई कोर्ट फि ॲक्ट मधील तरतुदीनुसार खरेदीखत रक्कम रु.३५,५०,०००/- रक्कमेवर आवश्यक तो कोर्ट फि स्टॅम्प दाव्यास लावलेला नाही.

१०.ना.मुंबई उच्च न्यायालयाचे 2022 (4) Mh LJ Page No.130 चे निवाडयानुसार वादीने वरील रक्कमेप्रमाणे दाव्याची किंमत करुन त्यावर स्टॅम्प लावणे आवश्यक आहे. वादीने त्याप्रमाणे पुर्तता केलेली नाही व स्टॅम्प लावलेला नाही. वादीचा दावा सि.पि.सि.ऑर्डर ७ रुल ११ प्रमाणे वेगवेगळे कायदयातील तरतुदीप्रमाणे बाधा निर्माण होत असल्याने वादीचा दावा रद्द होण्यास पात्र आहे.

**११.तरी मे.कोर्टास नम्र विनंती की,**

वरील कारणास्तव वादीचा दावा Barred By Any Law असल्यामुळे सि.पि.सि.ऑर्डर ७ रुल ११ प्रमाणे रद्द करण्यात यावा, ही विनंती.

येणेप्रमाणे ॲफिडेव्हिट केले असे.

नेवासा

दिनांक :- २३/०५/२०२५

ॲफिडेव्हिट करणार

ओळख

(ॲड.एस.बी.लवांडे)

याकामी मी धनराज जसराज भळगट, वय-७६, धंदा-शेती, रा.सोनई, ता.नेवासा, जि.अ.नगर सत्यप्रतिज्ञेवर खरे सांगतो की, वर नमूद केलेला संपूर्ण मजकूर हा माझ्या माहिती व सांगणेप्रमाणे खरा व बरोबर असून त्याचे सत्यतेसाठी मी आज रोजी माझी सही या लेखाखाली केली असे.

नेवासा

दिनांक :- २३/०५/२०२५

धनराज ज. भळगट

ॲफिडेव्हिट करणार

ED 776

Solemnly affirmed before me by Dhanraj Jasraj Bhalgat Age 76 occ Agri
who is identified before me by Adv S B Lawande R/o Sonai
whom I personally know
Nev

Asstt. Superintendent

Exh. 19

# नेवासा येथील मे. सिव्हिल जज्ज साहेब, ज्यु.डी.

यांचे कोर्टात

रे.मु.नं.
२०९/२०२५

वादी

अनिल हेमराज भळगट

प्रतिवादी

धनराज जसराज भळगट, वगैरे

**याकामी प्रतिवादी नं.१ ते ३ तर्फे दाव्याची व मनाई अर्जाची कैफियत असे ती खालीलप्रमाणे :-**

१) वादीचा दावा व मनाई अर्ज खरा नसून या प्रतिवादींना मान्य नाही, कबूल नाही. त्यातील संपूर्ण मजकूर हा कपोलकल्पीत असुन तो प्रतिवादी यांना मान्य व कबूल नाही, ते संपुर्ण मजकुर नाकारीत आहे.

२) वादीचा दावा कायदेशीर नाही, कायदयाप्रमाणे मेटेनेबल नाही. त्यामूळे रद्द होण्यास पात्र आहे.

३) वादीने सदरचा दावा दाखल करताना या माननिय कोर्टापासून सप्रेशन ऑफ फॅक्टस केलेले आहे आणि त्या कारणास्तव देखील सदरचा दावा व मनाई हुकूमाची विनंती कायदयाने मेंटेनेबल राहिलेली नाही आणि त्या कारणास्तव देखील सदरचा दावा व मनाई हुकूमाची मागणी रद्द होणेस पात्र आहे. दाव्यात आवश्यक पक्षकार सामिल केलेले नाहीत.

४) वादीने दाखल केलेल्या सदरच्या दाव्यास व मनाई हुकूमाचे अर्जास या प्रतिवादीं विरुध्द कोणतेही कॉझ ऑफ ॲक्शन डिसक्लोज होवू शकत नाही. तसेच सदर वादी यांनी मे.न्यायालयामध्ये याच दावा मिळकतीबाबत

Order

-----------------------------

Read & Recorded

SANDHYA YUVRAJ SUL
Digitally signed by SANDHYA YUVRAJ SUL
Date: 2025.05.23 18:35:39 +0530

2nd, Jt. CJJD, Newasa

रे.मु.नं.१०७६/२०२४ चा दावा प्र.वादी नं.१ यांचे विरुध्द व प्र.वादी नं.२ व ३ यांचे पती अनुक्रमे एकनाथ केरु वांढेकर व आण्णासाहेब रामदास आदमाने यांचे विरुध्द दाखल केलेला होता, तसेच त्या दाव्यामध्ये प्र.वादी नं.४ हीस देखील समाविष्ट केलेले आहे. सदरचा दावा हा मे.न्यायालयामध्ये दाखल असुन तो दावा आजही मा.न्यायालया समोर प्रलंबित आहे. प्रस्तुत दाव्यामध्ये वादीस मे.कोर्टा मार्फत कुठलाही रिलीफ मिळालेला नसल्यामुळे प्रस्तुत वादीने पुन्हा खोटे नविन कॉज ऑफ ॲक्शन दाखवुन प्रस्तुतचा दावा मा.न्यायालयात दाखल केलेला आहे. त्यामुळे प्रस्तुतच्या दाव्यास रेस-ज्युडिकेट्टा ची बाधा निर्माण होत असल्यामुळे प्रस्तुतचा दावा आणि मनाई हुकूमाचा अर्ज सिव्हिल प्रोसिजर कोडच्या ऑर्डर ७ रुल ११अ प्रमाणे रद्द होण्यास पात्र आहे.

५) तसेच प्रस्तुतचा वादी हा वेगवेगळया थेरी/ कपोलकल्पीत खोटी कथने करुन वेगवेगळे दावे या प्रतिवादी विरुध्द दाखल करत आहेत, त्यामुळे Mulitiplilty of Suit निर्माण होवून कायदेशिर गुंतागुंत निर्माण होणार आहे. त्यामुळे वादीचा दावा रद्द होण्यास पात्र आहे.

६) वादीस सदरचा दावा दाखल करण्यासाठी कायद्याने आवश्यक असणारी लोकस स्टँडी (locus-standy) नव्हती व नाही, कारण वादी हे दावा मिळकतीची मालक नाहीत अगर त्यांचा दावा मिळकतीशी काही एक संबंध नाही. वादीस दावा मिळकतीचे कुठल्याही प्रकारचे टायटल व पझेशन नव्हते व नाही, असण्याचे काही एक कारण नाही.

७) वादीने दाव्यास योग्य तो कोर्ट फि स्टॅम्प लावलेला नसल्याने वादीचा दावा रद्द होण्यास पात्र आहे.

८) प्रस्तुत वादीने सदरच्या दाव्यामध्ये विनंती पॅरा नं.३ मध्ये मो.र.नं.१८४/२०१७ चे केलेली फाळणी बेकायदेशिर ठरवुण मिळण्याची मागणी केलेली आहे. वास्तविक पाहता सदरची झालेली गट विभागणी फाळणी ही उपअधिक्षक भुमिअभिलेख्र नेवासा यांनी कायदेशिररित्या संपुर्ण प्रक्रिया पुर्ण करुन केलेली आहे. प्रस्तुतची फाळणी रद्द करण्यासाठी या मे.कोर्टास Teretorial Jurisdiction नाही. सदरचा अधिकार हा मा.जिल्हा अधिक्षक भुमिअभिलेख्र यांना आहे. त्यामुळे वादीने केलेली मागणी कायदेशिर नाही.

९) तसेच वादी यांनी मो.र.नं.१८४/२०१७ रद्द करण्याची मागणी केलेली असल्यामुळे वादीने तालुका उपअधिक्षक भुमिअभिलेख्र नेवासा यांना तसेच महसुली शासकीय अधिकारी यांना दाव्यात समाविष्ट केलेले नाही, त्यामुळे प्रस्तुतच्या दाव्यास नेसेसरीज् पार्टीज चा बाध निर्माण होत असल्याने वादीचा दावा रद्द होण्यास पात्र आहे.

१०) वादीने सदरच्या दाव्यामध्ये प्र.वादी नं.१ ने प्र.वादी नं.२ व ३ यांना दावा मिळकत १ब - ग.नं.५८३/२/ब , क्षेत्र २ हे.५३ आर ही संपुर्ण मिळकत कायमखरेदीखत दस्त नं.३३४/२०२५ अन्वये रक्कम रु.१७,७५,०००/- व दुसरे खरेदीखत दस्त क्रं.३३५/२०२५ अन्वये रक्कम रु.१७,७५,०००/- स विक्री केलेली आहे. अशी दावा मिळकतीची एकुण किंमत रक्कम रु.३५,५०,०००/- एवढी आहे. वादीने दोन्ही खरेदीखते चॅलेज केलेली आहेत. वादीने दाव्याची किंमत केवळ रुपये २०००/- करुन त्यावर स्टॅम्प लावलेला आहे. वास्तविक पाहता मुंबई कोर्ट फि ॲक्ट मधील तरतुदीनुसार कोर्ट फि स्टॅम्प दाव्यास लावलेला नसल्यामुळे वादीचा दावा प्रथमदर्शनी रद्द होण्यास पात्र आहे.

११) वादीचे दाव्यामधील संपूर्ण कथने ही वस्तुस्थितीचा विपर्यास करणारी असून मुलतः खोटी असून सदरची सर्व कथने या प्रतिवादीस मुळीच मान्य नाही, कबूल नाही. सदरची सर्व कथने या वादीने इंडियन एव्हीडन्स ॲक्टचे तरतुदीप्रमाणे सक्त रितीने साबीत करुन दाखवावीत.

१२) दाव्याचे टायटलमध्ये दावा कलम १ मध्ये दिलेले मिळकत वर्णन हे संपुर्णतः दिलेले नसल्यामुळे व ते अर्धवट व चुकीच्या पध्दतीने दिलेले आहे. तसेच दावा मिळकतीच्या चतु:सिमा जाणीवपुर्वक चुकीच्या दिलेल्या आहेत. त्यावरुन दावा मिळकत आयडेंटीफाय होऊ शकत नाही. सबब सदर दाव्यास सी पी.सी. ऑर्डर ७ रुल ३ चा बाध येत असल्याने दावा रद्द होण्यास पात्र आहे.

१३) वादीचे दावा कलम २ मधील मजकुर की, " सदर दाव्यातील वादी व प्रतिवादी नं.४ हे बहिण भाऊ असून प्रतिवादी नं.१ हे वादीचे चुलते आहे, हेमराज, प्रेमराज व धनराज हे तिघे भाऊ होते. " हा नातेसंबंधाबाबतचा मजकुर बरोबर आहे. पंरतु सदर कलम मधील पुढील मजकुर की, " सदर भावाचे प्रत्यक्षात वेगेवेगळे व्यवसाय होते परंतु आपसात प्रेमाचे आपुलकीचे संबंध होते. परंतु संपुर्ण जमिनीची वहिवाटही हेमराज व वादी हेच पाहत होते व आहे." हा संपूर्ण मजकूर खोटा व बनावट असुन तो या प्रतिवादींना मान्य नाही, कबूल नाही.

१४) वादीचे दावा कलम ३ मधील मजकुर की, "दावा कलम १ मध्ये वर्णन केलेली मिळकत गट नं.५८३/२/अ, क्षेत्र २ हे ५३ आर ही वादी व प्रतिवादी नं.४ यांचे मालकी हक्काची वहिवाटीची असुन गट नंबर ५८३/२/ब ही प्रतिवादी नं.१ याचे ताब्यात वहिवाटीस आहे. " हा संपूर्ण मजकूर खोटा व बनावट असुन तो या प्रतिवादींना मान्य नाही, कबूल नाही.

१५) वादीचे दावा कलम ४ मधील मजकुर की, " दावा कलम १अ मध्ये वर्णन केलेली मिळकत हिचा पुर्वीचा गट नंबर १८०३/२ क्षेत्र ३ हे ३७ आर याची चतुर्सिमा पुर्वेस शिव दक्षिणेस १८०५ पश्चिमेस १८०४ उत्तरेस १८०३/१ अशी आहे. ही मिळकत वादी यांचे वडिल हेमराज जसराज भळगट यांनी दि.२ सष्टेंबर १९७७ रोजी लक्ष्मण आप्पाजी सोनवणे यांचे कडुन कायम खरेदीखताने घेतलेली होती व आहे. सदरची मिळकत खरेदी घेतांना जिरायत होती त्यामध्ये वादी यांचे वडिल हेमराज जसराज भळगट यांनी विहीर खोदुन इले.मोटार व पाईपलाईन केलेली आहे. सदरची मिळकत ही हेमराज जसराज भळगट यांची स्वत: उत्पन्नातुन खरेदी केलेली आहे. व सदरची मिळकत ही वादी यांना देण्यात आलेली आहे." हा संपूर्ण मजकूर खोटा व बनावट असुन तो या प्रतिवादींना मान्य नाही, कबूल नाही.

१६) वादीचे दावा कलम ५ मधील मजकुर की, " दावा कलम १ब मध्ये वर्णन केलेली मिळकत ५८३/२/ब हिचा पुर्वीचा गट नंबर १८०३/१ असा असुन पुर्वेला शिव दक्षिणेस १८०३/२ पश्चिमेस १८०४ उत्तरेस १८०२ अशी असुन सदरची मिळकत ही प्रतिवादी नं.१ धनराज भळगट व त्याचे भाऊ प्रेमराज भळगट यांनी ८/२/१९८० रोजी खरेदी घेतली होती व आहे. दरम्यानचे काळात सन १९८२ मध्ये वादी, वादीचे वडिल, प्रतिवादी नं.१, प्रेमराज भळगट, यांच्यात वाटप झाले. सदरचे वाटपाप्रमाणे वादी यांना गट नंबर १८०३/१ मध्ये १ हे ६८ आर वादी यांचे वडिल हेमराज भळगट यांना गट नं.१८०३ क्षेत्र १ हे ६९ आर, नंतर प्रतिवादी नं.१ धनराज भळगट यांना गट नं.१८०३ क्षेत्र १ हे ६९ आर व प्रेमराज भळगट नं.१८०४ मध्ये १ हे ६९ आर असे वाटप झाल्याचे दिसून येत आहे. सदर दाव्यातील वादी यांनी ता.५/१२/२००३ रोजी त्याचे वडिल हेमराज भळगट यांना गट नंबर

१८०३/१ पैकी ० हे ५६ आर पुर्वेकडील व तसेच गट नंबर १८०३/१ पैकी ० हे ५६ आर धनराज भळगट यांना पश्चिमेकडील क्षेत्र फेर नं. २०४६८ व २०४६९ प्रमाणे विकल्याचे दिसून येत आहे. परंतु सदरचे वाटपात कोणत्याही प्रकारची दिशा ठरलेली नव्हती व नाही परंतु त्या प्रमाणे फेर नं.४१९० अन्वये ७/१२ उताऱ्यास नोंद झाली त्यानंतर सन २०११ मध्ये वादीचे वडिल हेमराज भळगट, प्रतिवादी नं.१ व प्रेमराज भळगट यांचे मयत वारस कांचनबाई भळगट यांच्यात वाटप झाल्याचे दिसुन येत आहे. त्या वाटपा प्रमाणे हेमराज भळगट (वादीचे वडील) यांना १८०३/१ मध्ये ० हे ८४ आर व तसेच १८०३/२ मध्ये १ हे ६९ आर व तसेच प्रतिवादी नं.१ यास १८०३/३ मध्ये १ हे ६९ आर व तसेच गट नं.१८०३/१ मध्ये ० हे ८४ आर, प्रेमराज भळगट यांना गट १८०३/४ क्षेत्र १ हे ६९ आर असे क्षेत्र वाटपाने दिल्याचे दिसुन येत आहे. परंतु सदर वाटपाप्रमाणे वादी यांचे वडिल, प्रतिवादी नं.१ व तसेच प्रतिवादी नं.१ चे भाऊ प्रेमराज भळगट यांच्यात कधीही प्रत्यक्ष कब्जेवहिवाट झाल्याची दिसुन येत नाही. दरम्यानचे काळात गट नंबर १८०३/२ व गट नं.१८०३/१ चे गट नंबर ५८३/१ व ५८३/२, ५८३/३ व ५८३/४ असे विभाजन झालेले आहे. " हा संपूर्ण मजकूर खोटा व बनावट असुन तो या प्रतिवादींना मान्य नाही, कबूल नाही.

१७) वादीचे दावा कलम ६ मधील मजकुर की, " वास्तविक पाहता सदर गट नंबर १८०३/२ याचे कब्जे वहिवाट वादी ता.२ सप्टेंबर १९७७ चे खरेदीखता पमाणे करीत असून सदर मिळकती मध्ये वादी यांचे वडिलांनी विहीर, पाईपलाईन व वस्ती स्वत: केलेली आहे. सदर विहीर पाईपलाईन वस्तीशी प्रतिवादी नं.१ याचा काहीएक संबंध नाही असे असतांना सदर दाव्यातील

प्रतिवादी नं.१ यांनी दावा कलम १ब गट नं.५८३/२/ब क्षेत्र २ हे ५३ आर ही मिळकत सदर दाव्यातील प्रतिवादी नं.२ व ३ यांना कायम स्वरुपी विकण्याचे ठरविले असुन व त्या प्रमाणे त्यांच्यात आपसात करार झाल्याचे दिसून येत आहे. सदर दाव्यातील प्रतिवादी नं.२ व ३ यांनी दे.सार्वमत दि.१३/११/२०२४ रोजीचे ॲड.सुनिल बी.गडाख यांचे मार्फत जाहीर नोटीस दिली. व सदरची नोटीस वादी यांचे वाचण्यात आली. वास्तविक पाहता सदर दाव्यातील प्रतिवादी नं.१ यांचा दावा कलम १ब मध्ये वर्णन केलेल्या मिळकतीशी कधीही कब्जे वहिवाट नव्हती व नाही तसेच विहीर व पाईपलाईन मध्ये प्रतिवादी नं.१ यांचा कधीही हक्क हितसंबंध नसतांना प्रतिवादी नं.१ यांनी पोकळीस्त नोंदीच्या आधार प्रतिवादी नं.२ व ३ यांना विक्री करण्याचे ठरविले वादी याने दि.१४/११/२०२४ रोजी प्रतिवादी नं.१ घरी जावुन विनंती की, जमिनीचे रेकॉर्ड दुरुस्त झाल्यावर विक्री करा त्यावेळी प्रतिवादी नं.१ याने वादीचे विनंती कडे दुर्लक्ष केले म्हणुन प्रतिवादी नं.१ यांनी दाव्यात वर्णन केलेल्या मिळकतीचे कोणत्याही तिऱ्हाईत इसमांस हस्तांतर करु नये असा निरंतर ताकीद मनाई हुकूमासाठी दावा सदर दाव्यातील प्रतिवादी नं.१ व तसेच प्रतिवादी नं.२ व ३ यांचे पती एकनाथ केरु वांढेकर व आण्णासाहेब रामदास आदमाने तसेच कल्पना राजेंद्र कटारिया यांचे विरुध्द दाखल केला होता त्याचा दावा नं.१०६७/२०२४ असून सदर दाव्यात प्रतिवादी नं.१ यांनी हजर होवून कैफियत दिली. दरम्यानचे काळात मा.कोर्टाने सदर दाव्यातील प्रतिवादी नं.१ विरुध्द आहे ती परिस्थिती कायम ठेवण्याचा हुकूम पुढील तारखे पर्यत केला होता. परंतु काही तांत्रिक कारणामुळे सदरचा हुकूम रद्द झाल्यानंतर सदर प्रतिवादी नं.१ याने प्रतिवादी नं.२ व ३ यांना तारीख २०/०१/२०२५

रोजी बेकायदेशिर खरेदीखत केले. वास्तविक पाहता सदर प्रतिवादी नं.१ यांचा दावा कलम १ब मध्ये नमुद केल्या प्रमाणे कधीही कब्जा वहिवाट नव्हती व नाही परंतु प्रतिवादी नं.१ याने भुमि अभिलेख नेवासा यांना हाताशी धरुन दावा कलम मध्ये वर्णन केलेल्या मिळकतीशी बेकायदेशिर फाळणी केली व त्या प्रमाणे फेरफार नं.३२०१३ नुसार सदर दावा कलम १अ व १ब असे नविन ७/१२ उतारे तयार झाले. परंतु त्या प्रमाणे सदर दाव्यातील प्रतिवादी नं.१ यांची कधीही कब्जे वहिवाट नव्हती व नाही. सदर दावा मिळकतीचे फाळणीचे संदर्भात प्रथम माहिती वादी यास प्रतिवादी नं.१ याने रे.मु.नं.१०७६/२०२४ मध्ये दिलेल्या कैफियतीत नमुद केल्या नंतर समजले. सदर दाव्यातील वादी यांचे वडिल हेमराज भळगट व प्रतिवादी नं.१ हे सख्खे भाऊ होते वादी यांचे वडिल हेमराज जसराज भळगट यांचे मृत्युसमई वय ८३ वर्षाचे होते व त्यांचा मृत्यु सन २०१९ मध्ये झाला. मृत्युपुर्वी ते वयस्कर असल्याने सतत आजारी असल्याचे व त्यांना व्यवहाराचे व आपण काय करतो याची समज त्यांना होत नसत त्याचा गैरफायदा घेवुन सदर दाव्यातील प्रतिवादी नं.१ याने भुमि अभिलेख नेवासा यांना हाताशी धरुन दावा मिळकतीचे बेकायदेशिर फाळणी करुन बेकायदेशीर वाद निर्माण केला याची माहिती वादीस नुकतीच झाली असुन वादी त्याबाबत योग्य ती पुढील कायदेशीर कार्यवाही करणार आहे." हा संपूर्ण मजकूर खोटा व बनावट असुन तो या प्रतिवादींना मान्य नाही, कबूल नाही. सदर कलम ६ मधील केवळ ॲड.एस.बी.गडाख यांचे मार्फत दै.सार्वमत या वृत्तपत्रात दि.१३/११/२०२४ रोजी दिलेली जाहिर नोटीसीबाबचा मजकुर खरा आहे, इतर सदर कलममधील संपुर्ण मजकुर हे प्रतिवादी नाकारीत आहेत.

१८) वादीचे दावा कलम ७ मधील मजकुर की, "सदर दाव्यातील प्रतिवादी नं.१ याने दावा कलम १ मध्ये वर्णन केलेल्या बेकायदेशीर रित्या २०/०१/२०२५ रोजी प्रतिवादी नं.१ यांनी प्रतिवादी नं.२ व ३ यांना करुन दिलेल्या खरेदीखत तसेच प्रतिवादी .१ याने मो र. न.१८४/२०१७ चा पोट हिस्सा मोजणी बेकायदेशीर करुन बेकायदेशीर फाळणी केली. म्हणुन सदर दाव्यातील वादी याने सदर दावा प्रतिवादी नं.१ ते ३ यांचे विरुध्द प्रतिवादी नं.१ याने प्रतिवादी नं.२ व ३ यांना करुन दिलेले दि.२०/०१/२०२५ रोजी करुन दिलेले खरेदीखत हे वादीवर बंधनकारक राहु नये असा जाहिर ठराव होवुन मिळावा तसेच सदर दावा कलम १ब मध्ये वर्णन केलेली मिळकत वादी आणि प्रतिवादी १ कडे बाजार भावा प्रमाणे अग्रहक्काने खरेदी करण्यास तयार असणे बाबत व साक्षीदार समक्ष विनंती केली परंतु प्रतिवादी याने वादीस तु माझ्या विरध्द दावा केला असल्याने मी तुला बाजार भावाप्रमाणे खरेदी देणार नाही तु माझे काहीएक वाकडे करु शकत नाही,मी तुला जमिनीतुन काढून देईल अशी धमकी दि.१५/०१/२०२५ रोजी दिली व त्यानंतर प्रतिवादी नं.१ याने प्रतिवादी नं.२ व ३ यांना नियमाप्रमाणे बाजारभावाप्रमाणे खरेदी घेण्यास तयार असल्याचे विनंती करुन देखील वादीचा दावा मिळकत खरेदी घेण्याचा कायदेशीर हक्क व अधिकार असतांना देखील सदरची दावा कलम १ब ही मिळकत प्रतिवादी नं.२ व ३ यांना ता.२०/०१/२०२५ रोजी बेकायदेशिर विक्री केली. वादी याचे दावा मिळकती कोणीही हरकत अडथळा करु नये असा निरतर ताकीद मनाई हुकूमासाठी तसेच प्रतिवादी नं.१ याने मो.र नं.१८४/२०१७ चे केलेले फाळणी हे बेकायदेशिर ठरवुन सदरची फाळणी वादीवर बंधनकारक राहु नये असा जाहिर ठराव होवून मिळवा म्हणून सदरचा दावा प्रतिवादी विरुध्द

जाहिर ठराव निरंतर ताकीद मनाई हुकूमासाठी दाखल करणे भाग पडले आहे. " हा संपूर्ण मजकूर खोटा व बनावट असुन तो या प्रतिवादींना मान्य नाही, कबूल नाही.

१९) वादीचे दावा कलम ८ मधील मजकुर की, " सदर प्रतिवादी नं.४ ही आजरोजी दाव्यात सही करण्यास हजर नसल्याने तिला वादीपणात सामिल केलेले आहे. तिच्या विरुध्द वादीला काहीएक मागणे नाही." हा संपूर्ण मजकूर खोटा व बनावट असुन तो या प्रतिवादींना मान्य नाही, कबूल नाही.

२०) वादीचे दावा कलम ९ मध्ये दिलेले दाव्याचे कारण हे खोटे व लबाडीचे असुन त्याप्रमाणे काही एक दाव्यास कारण घडलेले नाही. वादींचा दावा विनाकारण असलेने खर्चासह रद्द होणेस पात्र आहे.

२१) वादीने वादीच्या दावा कलम १३ मध्ये व मनाई अर्जात केलेल्या विनंत्या खोटया असुन त्या विनंत्या मान्य करण्यालायक नसुन कायद्यातील तरतुदी अन्वये योग्य व कायदेशीर नसल्याने त्या मान्य करता येणार नाही. त्यामुळे वादीने केलेल्या विनंत्या हा प्रतिवादी सक्तरितीने नाकारीत आहे.

२२) वास्तविक पाहता खरी परिस्थिती अशी आहे की, वादी हा प्रतिवादी नं.१ यांचा सख्ख्या भावाचा मुलगा म्हणजेच पुतण्या आहे. वादीने प्रस्तुतचा दावा हा केवळ वादीने भाऊकीतील द्वेषापोटी दाखल केलेला आहे. सदर वादी हा नेहमीच हया प्रतिवादी यांना आर्थिक लाभापोटी ब्लॅकमेल करु पाहत असतो. सदर प्रतिवादी नं.१ हे अत्यंत वयस्कर आहे, त्यांचे वय ८० वर्षापेक्षा जास्त आहे, ते नेहमी आजारी असतात, त्यांना एकमेव मुलगा पंकज असुन तो बाहेरगावी वास्तव्यास आहे. तसेच या प्रतिवादी नं.१ यांचा दुसरा एक मुलगा होता, त्याचा नऊ-दहा वर्षापुर्वी आकस्मित मृत्यु झालेला

आहे. या प्रतिवादी नं.१ यांची पत्नी देखील वयस्कर असुन आजारी असते. सदरचे प्रतिवादी नं.१ व त्यांची पत्नी हे दोघेच सोनई येथे राहतात, त्यांना कोणाचाही आधार नाही, अश्या परिस्थितीचा गैरफायदा घेवून वादी हे त्यांना नेहमी ब्लॅकमेल करु पाहतात, त्यांना शिवीगाळ करतात व त्यांचे नावे असलेली शेतजमिन ही बेकायदेशिररित्या बळकविण्याचा प्रयत्नात आहेत.

२३) सदर प्र.वादी नं.१ यांना आजारपण, औषधोपचार तसेच स्वत:च्या दैनंदिन गरजा लोकांची आर्थिक देणे देण्याकरीता मोठी आर्थिक गरज असल्यामुळे त्यांनी त्यांचे स्वतंत्र अश्या हिस्स्याची मालकी हक्क कब्जाची व ताब्यातील वहिवाटीत असलेली शेतजमिन मौजे सोनई (नविन),ता.नेवासा येथील गट नं.५८३/२/ब, क्षेत्र २ हे.५३ आर या मिळकतीशिवाय कुठलेही उपजिवीकेचे साधन त्यांचेकडे नसल्याने प्रस्तुतची मिळकत त्यांनी त्यांचे आर्थिक गरजेकरीता विक्रीस काढली असता वादी याने अभिलाषा बुध्दीने प्रतिवादी नं.१ हा केवळ आपला चुलता आहे, वयस्कर आहे, प्र.वादीचा मुलगा हा गरीब स्वभावाचा आहे, त्याला कोणाचाही आधार नाही. याचा गैरफायदा घेवून सदरची मिळकत ही गिंळकृत करता यावी म्हणून प्रस्तुतचा खोटया स्वरुपाचा दावा वादीने मे.कोर्टासमोर दाखल केलेला आहे.

२४) प्रस्तुत दावा मिळकती पैकी मौजे सोनई (नविन) येथील दाव्यात नमुद दावा मिळकत वर्णन कलम १ब गट नं.५८३/२/ब , क्षेत्र २ हे.५३ आर ही मिळकत प्रतिवादी नं.१ यांची स्वतंत्र मालकी हक्क कब्जेवहिवाटीची मिळकत होती व आहे. सदरची मिळकत ही त्यांना वाटपानुसार स्वतंत्ररित्या मिळालेली आहे. त्यांची स्वतंत्र वहिवाट आहे. प्रतिवादी नं.१ ही स्वतंत्ररित्या शेतजमिनीची वहिवाट करुन उत्पन्न उपभोग घेतात, त्यांची अव्याहतपणे वरील मिळकतीवर मालकी कब्जा व वहिवाट आहे. सदरच्या मिळकतीमध्ये

या वादीचा अगर इतर कुणाचाही काहीएक हितसंबंध हक्क अधिकार, कब्जा नव्हता व नाही.

२५) सदर वादीचा स्वतंत्र असा मौजे सोनई येथील गट नं.५८३/२/अ, क्षेत्र २ हे.५३ आर असे क्षेत्र स्वतंत्ररित्या वादी व त्यांची सख्खी बहिण प्रतिवादी नं.४ यांच्या नावावर आहे. त्यांची स्वतंत्ररित्या सदर क्षेत्रावर मालकी हक्क वहिवाट आहे. वादी व प्र.वादी नं.१ यांचा व दावा मिळकत १अ व १ब बाबत एकमेकांशी काहीएक संबध नाही. वादीने केवळ दोन्ही मिळकती हया एका दाव्यात गुंतागुंत निर्माण करुन मे.कोर्टाची दिशाभुल करता यावी या उद्देशाने समाविष्ट केलेल्या आहेत.

२६) वादी व प्र.वादी नं.१ व ४ यांचे पुर्वीची वंशावळी बाबतचा खुलासा असा आहे की, प्र.वादी नं.१ धनराज, हेमराज व प्रेमराज असे तिन सख्खे भाऊ होते. वादी हा हेमराज यांचा मुलगा आहे, हेमराज व प्रेमराज हे दोघेही मयत आहेत. असे असतांना सन १९७७ मध्ये प्र.वादी नं.१ धनराज, हेमराज व प्रेमराज यांचे तिघांचे एकत्र कुटूंब होते. सदर दावा मिळकत ही या तिन भावांनी मुळ जमिन मालक लक्ष्मण आप्पाजी सोनवणे व इतर यांचेकडून खरेदी केलेली मिळकत आहे. सदरची संपुर्ण दावा मिळकत ही प्र.वादी नं.१ धनराज, हेमराज व प्रेमराज यांनी एकत्रात सन १९७७ मध्ये हेमराज यांचे नावे ३ हे.३७ आर व सन १९८० मध्ये प्र.वादी नं.१ धनराज व प्रेमराज यांचे नावे सामाईकात ३ हे.३८ आर विकत घेतलेली होती व आहे. अश्या प्रकारे संपुर्ण तिन भावाच्या एकत्र कुटूंबामध्ये ६ हे.७५ आर अशी एकत्रित मिळकत होती. त्यावेळी संपुर्ण एकत्र कुटूंब असल्यामुळे एकत्रात मेहनत मशागत करुन सर्व उत्पन्न उपभोग घेत होते. सदर शेतजमिनीचा या तिन भावांनी एकत्रीतरित्या सदरची मिळकतीमध्ये अनेक सुधारणा केल्या,

त्यामध्ये शेतीसाठी लागणाऱ्या पाण्याच्या सुविधेकरीता तिन भावांनी त्यांचे एकत्रित उत्पन्नातुन एक विहीर खोदली. त्या विहीरीवर इले.मोटार बसविण्यात आलेली आहे, तसेच पाईपलाईन केलेली आहे. सदर विहीरीवरील इलेक्ट्रीक कनेक्शन घेण्यात आलेले आहे, सदरचे कनेक्शन हे त्यावेळी प्र.वादी नं.१ चे नावावर घेण्यात आलेले आहे, ते आजही कनेक्शन चालु स्थितीत आहे.

२७) अशी परिस्थिती असतांना सन १९८२ मध्ये वादीचे वडिल हेमराज हे सर्वात मोठे बंधु होते. त्यांचा मुलगा वादी अनिल हा देखील मोठा असल्यामुळे एकत्र कुटूंबातील व्यवहार त्यास समजु लागले. सदरचे व्यवहार समजु लागल्यामुळे व वादीचे वडील हे कुटूंबातील आर्थिक कारभार पाहतात याचा गैरफायदा घेवून वादी हा एकत्र कुटूंबातील पैसे घेवून तो आडदांड व नंगट गुन्हेगारी प्रवृत्तीचा असल्यामुळे तो गुन्हेगारी लोकांत वावरत असे व एकत्र कुटूंबातील पैश्याचा वापर चैन विलासाचे जीवन जगणेकामी खर्च करु लागला व कुटूंबामध्ये चुलते प्र.वादी नं.१ व मयत प्रेमराज यांना दमदाटी करु लागला तसेच स्वत:च्या वडिलांना देखील दमदाटी करुन पैसे घेवून त्याचा दुरुपयोग करु लागला. त्यामुळे कुटूंबामध्ये कलह निर्माण झ ाला.

२८) त्यामुळे सन १९८२ मध्ये प्र.वादी नं.१ धनराज, हेमराज, प्रेमराज या तिन भावांमध्ये व हेमराज यांचा मुलगा वादी यांचे दरम्यान मा.तहसिलदार नेवासा यांचेकडे जमिन महसुल अधिनियम कलम ८५ प्रमाणे वाटप झाले व त्या वाटपानुसार हेमराज यांचे हिश्यास १ हे.६९ आर, प्रेमराज यांचे हिश्यास १ हे.६९ आर व प्र.वादी नं.१ धनराज यांचे हिश्यास १ हे.६९ आर याप्रमाणे तिन भावांना समान हिश्याप्रमाणे वाटपात क्षेत्र देण्यात आले.

परंतु, सदरच्या वाटपामध्ये वादी अनिल यांचे वडिलांना त्यांचा योग्य तो कायदेशिर हिस्सा दिलेला असतांना देखील वादी अनिल यांनी प्रेमराज व धनराज यांना दमदाटी करुन बळजबरीने त्यांचे प्रमाणेच स्वत:ला देखील एक हिस्सा प्रस्तुतच्या वाटपामध्ये घेतलेला आहे. त्यावेळी अनिल यांचे नावे १ हे.६८ आर क्षेत्र सन १९८२ साली जादा देण्यात आले. प्रस्तुतचे वाटप मा.तहसिलदार नेवासा यांचेकडील आदेश वाटप/एस.आर/१५४/८२ दि.२०/०९/१९८२ नुसार झाले व त्यानुसार त्याची नोंद गावचे रेकॉर्ड ऑफ राईटला फेरफार नं.४१९० अन्वये झालेली आहे. त्या वाटपानुसार तीन भाऊ व अनिल यांचे स्वतंत्र हिस्से वहिवाट निर्माण झाली व त्याप्रमाणे जो-तो त्याचे क्षेत्राची प्रत्यक्ष वहिवाट करुन उत्पन्न घेवू लागले.

२९) त्यांनंतर दि.०७/१०/२००३ रोजी वादी अनिल याने स्वत:चे चैन विलासा करीता त्याचे नावे असलेली मिळकत तिऱ्हाईतांस विक्री करु पाहू लागला. त्यावेळी अनिल याचे नावे असलेले १ हे.६८ आर क्षेत्रापैकी हेमराज यांनी ० हे.५६ आर पुर्वेकडील क्षेत्र दि.०७/१०/२००३ रोजी खरेदीखताने घेतलेले आहे. त्याच वेळी वादी अनिल याचे नावावरील क्षेत्रापैकी प्र.वादी नं.१ धनराज यांनी ० हे.५६ आर पश्चिमेकडील क्षेत्र कायमखरेदी दस्त क्रं.३३१९/२००३ नुसार घेतलेले आहे. तसेच त्याच वेळी वादी अनिल याचे नावावरील उर्वरित मधले ० हे.५६ आर हे हेमराज व प्र.वादी नं.१ धनराज यांनी कायमखरेदी दस्तान्वये खरेदी केलेले आहे व खरेदीखतातील नमुद चतुर्सिमेप्रमाणे प्रत्यक्ष ताबा देखील या प्र.वादी नं.१ यास दिलेला आहे. अश्या प्रकारे वादी अनिल याने त्याचे नावावरील संपुर्ण क्षेत्र हे कायदेशिररित्या प्र.वादी नं.१ यांना विक्री केलेले आहे, त्यामुळे वादी यांचा मालकी हक्क संपुष्ठात आलेला आहे.

३०) अश्याप्रकारे प्र.वादी नं.१ यांना त्यांचे सन १९८२ सालचे वाटपानुसार आलेले १ हे.६९ आर + खरेदी घेतलेले ० हे.५६ आर + दुसऱ्या सामाईक खरेदीखतातील १/२ हिस्सा म्हणजे ० हे.२८ आर क्षेत्र असे एकूण २ हे.५३ आर क्षेत्र हे प्रतिवादी नं.१ यांचे प्रत्यक्ष मालकी हक्क कब्जेवहिवाटीचे आहे. वास्तविक पाहता वादी अनिल यांनी प्रतिवादीस खरेदीखतामध्ये दिशा नमुद करुन क्षेत्र विक्री केलेले आहे. त्या चतुर्सिमेप्रमाणे अव्याहतपणे खरेदी घेतलेल्या दिनांकापासून प्र.वादी नं.१ यांची कब्जेवहिवाट मालकी हक्काने होती व आहे.

३१) सदर प्रतिवादी नं.१ धनराज यांनी त्यांचे नावे असलेल्या मिळकतीबाबतचा स्वतंत्ररित्या पोटहिस्सा फाळणी होवून मिळणेकामी मा.उपअधिक्षक भुमिअभिलेख नेवासा यांचे सन २०१७ मध्ये अर्ज दाखल केला, त्यास वादीचे वडील हेमराज यांनी देखील ते हयात असतांना संमती दर्शविलेली होती, त्यानुसार वादीचे वडिल हेमराज व प्र.वादी नं.१ धनराज यांच्या दोघांच्या सहमतीने मा.उपअधिक्षक भुमिअभिलेख नेवासा यांनी त्यास मो.र.नं.१८४/२०१७, ता.१०/०२/२०१७ देवून पुर्वीचा मौजे सोनई येथील गट न.५८३/२, एकुण क्षेत्र ५ हे.०६ आर या गटाची मोजणी दि.२२/०२/२०१७ रोजी करुन पोटहिस्सा फाळणी अन्वये केलेली आहे. त्याप्रमाणे वादीचे वडिल हेमराज यांचे नावावरील असलेल्या क्षेत्राचा ग.नं.५८३/२/अ, क्षेत्र २ हे.५३ आर याचा स्वतंत्र गट निर्माण झालेला आहे व प्र.वादी नं.१ धनराज यांचे नावावरील असलेल्या क्षेत्राचा गट नं.५८३/२/ब, क्षेत्र २ हे.५३ आर याचा स्वतंत्र गट निर्माण झालेला आहे आणि त्या स्वतंत्र पोटहिस्सा फाळणी करुन दोन कायदेशिर स्वतंत्र हिस्से व गट निर्माण झालेले आहेत, त्या गटाप्रमाणे या प्र.वादी नं.१ यांची मालकी

हक्क कब्जा व वहिवाट ही ग.नं.५८३/२/ब प्रमाणे आजतागायत आहे व तसेच ग.नं.५८३/२/अ या स्वतंत्र फाळणी बाराचे नकाशाप्रमाणे वादीची मालकी हक्क, वहिवाट आहे.

३२) वादी हा जाणीवपुर्वक हेतुपरस्कर, लालसेपोटी प्रतिवादी नं.१ ते ३ यांना ब्लॅकमेल करण्याच्या उद्देशाने मो.र.नं.१८४/२०१७ चे फाळणी बाराच्या मोजणीबाबत खोटी विधाने कथने करुन मे.कोर्टाची दिशाभुल करुन बेकायदेशिररित्या प्रतिवादी नं.१ ते ३ यांची दावा मिळकत हडप करण्याच्या प्रयत्नात आहे व त्या आधारे वादी प्रतिवादी नं.१ ते ३ यांना ब्लॅकमेल करत आहे.

३३) सदर प्रतिवादी नं.१ यांची सन १९८२ पासून आजतागायत मालकी हक्काने कब्जावहिवाट गटामध्ये फाळणी बाराचे नकाशाप्रमाणे पुर्व बाजुने आहे. तसेच त्याचे मालकीचे क्षेत्रात त्यांनी शेती अवजारे व शेतीमालासाठी दोन पत्र्याच्या खोल्या व एक पत्र्याचे शेड तयार केलेले आहे ते प्र.वादी नं.१ चे स्वतंत्र मालकीचे आहे. तसेच त्यामध्ये एक सामाईक विहीर आहे, सदरचे विहीरीचे पाणी वापरण्याचा हक्क, अधिकार हा वादी व प्रतिवादी नं.१ यांना समान हिश्याने पुर्वापार असा आहे. सदर विहीरीवरुन या प्रतिवादीचे नावे असलेल्या व ताब्यात असलेल्या गटातील असलेल्या क्षेत्रामध्ये शेती करीता विहीरीवरुन पाईपलाईन केलेली आहे. सदरची पाईपलाईन ही सन १९८२ सालचे वाटपापुर्वी केलेली आहे. तसेच पाईपलाईनचा वापर वादी व प्र.वादी नं.१ यांचा समान हिश्याप्रमाणे आहे. सदर विहीरीवरील इलेक्ट्रीक कनेक्शन हे प्र.वादी नं.१ धनराज यांचे नावे आहे. तसेच वादीच्या नावावरील मिळकतीमध्ये त्याचा स्वतंत्र एक बोअरवेल आहे. तसेच या

प्र.वादी नं.१ यांचा देखील त्याचे मिळकतीमध्ये एक स्वतंत्र बोअरवेल आहे. येणेप्रमाणे सत्य वस्तुस्थिती अशी आहे.

३४) वादीचा दावा पाहता वादीने दावा कलम ३ मध्ये प्र.वादी नं.१ यांच्या ताब्यात ग.नं.५८३/२/ब ही मिळकत वहिवाटीस आहे, असे मान्य केलेले आहे. तसेच वादीचा दावा हा मोघम व्हेग स्वरुपाचा असा आहे. त्यामुळे वादीचा दावा हा Hopless & Bard by Law असा आहे. सबब वादीचा दावा रद्द होण्यास पात्र आहे.

३५) प्रस्तुत दावा मिळकत प्रतिवादी नं.१ यांनी विक्रीस काढल्याची माहिती वादीस झाल्यानंतर वादीने मे.न्यायालयातमध्ये रे.मु.नं.१०७६/२०२४ चा दावा खोटा बनावट दाखल केलेला होता. सदरच्या दाव्यामध्ये मे.कोर्टाने एकतर्फा स्टेटस-को चा आदेश पारित केलेला होता. प्रतिवादी हे हजर झाल्यानंतर मे.कोर्टाने स्टेटस-को चा आदेश रद्द केला. त्यानंतर प्रस्तुत दाव्यातील दावा मिळकत १ब - ग.नं.५८३/२/ब, क्षेत्र २ हे.५३ आर ही संपुर्ण मिळकत ही दरम्यानच्या काळामध्ये प्रतिवादी नं.१ यांना पैश्यांची अत्यंत गरज असल्यामुळे व त्यांना सोईस्कर अशी गुंतवणूक करण्यासाठी,लोकांची देणी देण्याकरीता, कर्ज भरण्याकरीता पैश्याची आवश्यकता असल्यामुळे सदरची मिळकत ही प्र.वादी नं.१ यांनी प्रतिवादी नं.२ व ३ यांनी दि.२०/०१/२०२५ रोजी कायमखरेदीखत दस्त क्रं.३३४/२०२५ व कायमखरेदीखत दस्त क्रं.३३५/२०२५ या दोन खरेदीखतान्वये मालकी हक्काने विक्री केलेली आहे. तेंव्हापासुन सदर मिळकतीवर प्र.वादी नं.१ व २ यांची मालकी हक्काने कब्जेवहिवाट निर्माण झालेली आहे. प्र.वादी नं.२ व ३ हे सदर मिळकतीचे अव्याहतपणे मालक व

कब्जेदार झालेले आहेत. त्यांचा ताबा आजरोजी मो.र.नं.१८४/२०१७ चे फाळणी नकाशाप्रमाणे पुर्व बाजुकडून असा आहे.

३६) वादीने दाव्यात दावा कलम १३ मध्ये तसेच नि.नं.५ व नि.१३ वरील केलेल्या विनंत्या हया बेकायदेशिर असुन वादीची कोणतीही विनंती मान्य करण्यात येवू नये.

३७) वादीने प्र.वादी नं.१ ते ३ यांना विनाकारण आर्थिक व मानसिक त्रास देण्यासाठी, प्र.वादी नं.१ हे वयस्करपणाचा गैरफायदा घेण्यासाठी, आर्थिक फायदयासाठी तसेच त्यांना त्याच्या न्यायहक्कापासून वचिंत ठेवण्याच्या उद्देशाने वादीने जाणीवपुर्वक प्रस्तुतचा खोटा व बनावट दावा दाखल केलेला आहे.

३८) सदरील वादी यांना प्रथमदर्शनी केस नाही, न्यायाचा समतोलपणाही वादीचे बाजुने नाही. मनाई हुकूम न दिल्यास सदरील वादी यांचे कोणतेही नुकसान होणार नाही.

३९) अशी सर्व परिस्थिती असताना वादीने या प्रतिवादींना त्रास देण्यासाठी जाणीवपूर्वक खोटा दावा, खोटा मनाई हुकूमाचा अर्ज खोटे ॲफिडेव्हिट करुन या प्रतिवादींना निष्कारण खर्चात पाडले म्हणून या प्रतिवादींना वादीकडून रक्कम रु. ५०,०००/- रुपये कॉम्पेनसेटरी कॉस्ट देण्याचा हुकूम या व्हावा.

४०) सदर प्रतिवादी नं.१ ते ३ यांना वादी व त्याचे कुटूंबीय हे दावा मिळकत गट नं.५८३/२/ब, क्षेत्र २ हे.५३ आर या मिळकतीचे मालकी हक्क कब्जेवहिवाटीस, उत्पन्न उपभोगास बेकायदेशिररित्या हरकत अडथळे करत आहेत. त्यामुळे प्रतिवादी हे लवकरच आवश्यक कागदपत्रे, माहिती, पुरावा घेवून सविस्तर असा या दाव्यास प्रतिदावा न्यायहक्कासाठी कायदेशिर

संपुर्ण मागणीसह दाखल करणार आहेत, त्यास मे.कोर्टाची परवानगी असावी, तसेच प्रतिदावा दाखल करण्याचा हक्क राखुन प्रस्तुतची कैफियत प्र.वादी नं.१ ते ३ आजरोजी देत आहेत.

४१) येणेप्रमाणे वरील संपूर्ण कायदेशीर मुद्यांचा, वस्तुस्थितीचा विचार करुन या माननिय कोर्टाने वादीचा सदरचा दावा आणि मनाई हुकूमाचा अर्ज खर्चासहीत रद्द करावा, आणि या प्रतिवादींना त्यांचा खर्च मिळावा, ही विनंती.

४२) प्र.वादी नं.१ ते ३ यांना काही जुन्या कागदपत्रे व माहिती अभावी कैफियतीमध्ये नमुद करणे राहुन गेल्यास ज्यादा कैफियत देण्याची अथवा कैफियत दुरुस्त करण्याची परवानगी असावी.

येणेप्रमाणे प्रतिवादी नं.१ ते ३ तर्फे वादीच्या खोटया मजकूराच्या दाव्याला आणि नि.५ व नि.१३ चे मनाई हुकूमाचे अर्जाला कैफियत असे.

नेवासा

दिनांक :- २३/०५/२०२५

१. धनराज ज. भ[illegible]

२. ई.आ. आदमने

३. [illegible]

प्र.वादी नं.१ ते ३

पक्षकाराने दिलेल्या माहितीवरुन व सांगितलेवरुन सदर कैफियतीचा मसुदा तयार करुन दाखल केला असे.

प्रतिवादी नं.१ ते ३ तर्फे ॲडव्होकेट

(ॲड.एस.बी.लवांडे)

याकामी मी प्रतिवादी नं.१ ते ३ सत्य प्रतिज्ञेवर खरे सांगतोत की, वर नमूद केलेला कैफियत कलम १ ते ४२ मधील संपूर्ण मजकूर हा आमच्या माहिती व सांगणेप्रमाणे खरा व बरोबर असून त्याचे सत्यतेसाठी आम्ही आज रोजी आमच्या सहया/अंगठे या लेखाखाली केले असे.

नेवासा

दिनांक :- २३/०५/२०२५

१.

२.

३.

प्र.वादी नं.१ ते ३

Exh. 20

## //ॲफिडेव्हिट//

**नेवासा येथील मे. सिव्हिल जज्ज साहेब, ज्यु.डी.**

**यांचे कोर्टात**

**रे.मु.नं.**
२०९/२०२५

**वादी**

अनिल हेमराज भळगट

**प्रतिवादी**

धनराज जसराज भळगट, वगैरे

**याकामी मी प्रतिवादी नं.१ धनराज जसराज भळगट, वय-७६, धंदा-शेती, रा.सोनई, ता.नेवासा, जि.अ.नगर सत्यप्रतिज्ञेवर ॲफिडेव्हिट करतो की,**

१) वादीचा दावा व मनाई अर्ज खरा नसून या प्रतिवादींना मान्य नाही, कबूल नाही. त्यातील संपूर्ण मजकूर हा कपोलकल्पीत असुन तो प्रतिवादी यांना मान्य व कबूल नाही, ते संपूर्ण मजकुर नाकारीत आहे.

२) वादीचा दावा कायदेशीर नाही, कायदयाप्रमाणे मेंटेनेबल नाही. त्यामूळे रद्द होण्यास पात्र आहे.

३) वादीने सदरचा दावा दाखल करताना या माननिय कोर्टापासून सप्रेशन ऑफ फॅक्टस केलेले आहे आणि त्या कारणास्तव देखील सदरचा दावा व मनाई हुकूमाची विनंती कायदयाने मेंटेनेबल राहिलेली नाही आणि त्या कारणास्तव देखील सदरचा दावा व मनाई हुकूमाची मागणी रद्द होणेस पात्र आहे. दाव्यात आवश्यक पक्षकार सामिल केलेले नाहीत.

४) वादीने दाखल केलेल्या सदरच्या दाव्यास व मनाई हुकूमाचे अर्जास या प्रतिवादी विरुध्द कोणतेही कॉझ ऑफ ॲक्शन डिसक्लोज होवू शकत

Order

------------------------------

Seen & filed

SANDHYA YUVRAJ SUL

Digitally signed by SANDHYA YUVRAJ SUL
Date: 2025.05.23 18:35:53 +0530

2nd, Jt. CJJD, Newasa

२३/३/२५

Assistant Superintendent
Criminal Court Newasa

नाही. तसेच सदर वादी यांनी मे.न्यायालयामध्ये याच दावा मिळकतीबाबत रे.मु.नं.१०७६/२०२४ चा दावा प्र.वादी नं.१ यांचे विरुध्द व प्र.वादी नं.२ व ३ यांचे पती अनुक्रमे एकनाथ केरु वांढेकर व आण्णासाहेब रामदास आदमाने यांचे विरुध्द दाखल केलेला होता, तसेच त्या दाव्यामध्ये प्र.वादी नं.४ हीस देखील समाविष्ट केलेले आहे. सदरचा दावा हा मे.न्यायालयामध्ये दाखल असुन तो दावा आजही मा.न्यायालया समोर प्रलंबित आहे. प्रस्तुत दाव्यामध्ये वादीस मे.कोर्टा मार्फत कुठलाही रिलीफ मिळालेला नसल्यामुळे प्रस्तुत वादीने पुन्हा खोटे नविन कॉज ऑफ ॲक्शन दाखवुन प्रस्तुतचा दावा मा.न्यायालयात दाखल केलेला आहे. त्यामुळे प्रस्तुतच्या दाव्यास रेस-ज्युडिकेट्टा ची बाधा निर्माण होत असल्यामुळे प्रस्तुतचा दावा आणि मनाई हुकूमाचा अर्ज सिव्हिल प्रोसिजर कोडच्या ऑर्डर ७ रुल ११अ प्रमाणे रद्द होण्यास पात्र आहे.

५) तसेच प्रस्तुतचा वादी हा वेगवेगळ्या थेरी/ कपोलकल्पीत खोटी कथने करुन वेगवेगळे दावे या प्रतिवादी विरुध्द दाखल करत आहेत, त्यामुळे Mulitiplilty of Suit निर्माण होवून कायदेशिर गुंतागुंत निर्माण होणार आहे. त्यामुळे वादीचा दावा रद्द होण्यास पात्र आहे.

६) वादीस सदरचा दावा दाखल करण्यासाठी कायद्याने आवश्यक असणारी लोकस स्टँडी (locus-standy) नव्हती व नाही, कारण वादी हे दावा मिळकतीची मालक नाहीत अगर त्यांचा दावा मिळकतीशी काही एक संबंध नाही. वादीस दावा मिळकतीचे कुठल्याही प्रकारचे टायटल व पझेशन नव्हते व नाही, असण्याचे काही एक कारण नाही.

७) वादीने दाव्यास योग्य तो कोर्ट फि स्टॅम्प लावलेला नसल्याने वादीचा दावा रद्द होण्यास पात्र आहे.

८) प्रस्तुत वादीने सदरच्या दाव्यामध्ये विनंती पॅरा नं.३ मध्ये मो.र.नं.१८४/२०१७ चे केलेली फाळणी बेकायदेशिर ठरवुण मिळण्याची मागणी केलेली आहे. वास्तविक पाहता सदरची झालेली गट विभागणी फाळणी ही उपअधिक्षक भुमिअभिलेख नेवासा यांनी कायदेशिररित्या संपुर्ण प्रक्रिया पुर्ण करुन केलेली आहे. प्रस्तुतची फाळणी रद्द करण्यासाठी या मे.कोर्टास Teretorial Jurisdiction नाही. सदरचा अधिकार हा मा.जिल्हा अधिक्षक भुमिअभिलेख यांना आहे. त्यामुळे वादीने केलेली मागणी कायदेशिर नाही.

९) तसेच वादी यांनी मो.र.नं.१८४/२०१७ रद्द करण्याची मागणी केलेली असल्यामुळे वादीने तालुका उपअधिक्षक भुमिअभिलेख नेवासा यांना तसेच महसुली शासकीय अधिकारी यांना दाव्यात समाविष्ट केलेले नाही, त्यामुळे प्रस्तुतच्या दाव्यास नेसेसरीज् पार्टीज चा बाध निर्माण होत असल्याने वादीचा दावा रद्द होण्यास पात्र आहे.

१०) वादीने सदरच्या दाव्यामध्ये प्र.वादी नं.१ ने प्र.वादी नं.२ व ३ यांना दावा मिळकत १ब - ग.नं.५८३/२/ब , क्षेत्र २ हे.५३ आर ही संपुर्ण मिळकत कायमखरेदीखत दस्त नं.३३४/२०२५ अन्वये रक्कम रु.१७,७५,०००/- व दुसरे खरेदीखत दस्त क्रं.३३५/२०२५ अन्वये रक्कम रु.१७,७५,०००/- स विक्री केलेली आहे. अशी दावा मिळकतीची एकुण किंमत रक्कम रु.३५,५०,०००/- एवढी आहे. वादीने दोन्ही खरेदीखते चॅलेंज केलेली आहेत. वादीने दाव्याची किंमत केवळ रुपये २०००/- करुन त्यावर स्टॅम्प लावलेला आहे. वास्तविक पाहता मुंबई कोर्ट फि ॲक्ट मधील तरतुदीनुसार कोर्ट फि स्टॅम्प दाव्यास लावलेला नसल्यामुळे वादीचा दावा प्रथमदर्शनी रद्द होण्यास पात्र आहे.

Superintendent
Newasa

११) वादीचे दाव्यामधील संपूर्ण कथने ही वस्तुस्थितीचा विपर्यास करणारी असून मुलतः खोटी असून सदरची सर्व कथने या प्रतिवादीस मुळीच मान्य नाही, कबूल नाही. सदरची सर्व कथने या वादीने इंडियन एव्हीडन्स ॲक्टचे तरतुदीप्रमाणे सक्त रितीने साबीत करुन दाखवावीत.

१२) दाव्याचे टायटलमध्ये दावा कलम १ मध्ये दिलेले मिळकत वर्णन हे संपुर्णतः दिलेले नसल्यामुळे व ते अर्धवट व चुकीच्या पध्दतीने दिलेले आहे. तसेच दावा मिळकतीच्या चतु:सिमा जाणीवपुर्वक चुकीच्या दिलेल्या आहेत. त्यावरुन दावा मिळकत आयडेंटीफाय होऊ शकत नाही. सबब सदर दाव्यास सी पी.सी. ऑर्डर ७ रुल ३ चा बाध येत असल्याने दावा रद्द होण्यास पात्र आहे.

१३) वादीचे दावा कलम २ मधील मजकुर की, " सदर दाव्यातील वादी व प्रतिवादी नं.४ हे बहिण भाऊ असून प्रतिवादी नं.१ हे वादीचे चुलते आहे, हेमराज, प्रेमराज व धनराज हे तिघे भाऊ होते. " हा नातेसंबंधाबाबतचा मजकुर बरोबर आहे. पंरतु सदर कलम मधील पुढील मजकुर की, " सदर भावाचे प्रत्यक्षात वेगेवेगळे व्यवसाय होते परंतु आपसात प्रेमाचे आपुलकीचे संबंध होते. परंतु संपुर्ण जमिनीची वहिवाटही हेमराज व वादी हेच पाहत होते व आहे." हा संपूर्ण मजकूर खोटा व बनावट असुन तो या प्रतिवादींना मान्य नाही, कबूल नाही.

१४) वादीचे दावा कलम ३ मधील मजकुर की, "दावा कलम १ मध्ये वर्णन केलेली मिळकत गट नं.५८३/२/अ, क्षेत्र २ हे ५३ आर ही वादी व प्रतिवादी नं.४ यांचे मालकी हक्काची वहिवाटीची असुन गट नंबर ५८३/२/ब ही प्रतिवादी नं.१ याचे ताब्यात वहिवाटीस आहे. " हा संपूर्ण मजकूर खोटा व बनावट असुन तो या प्रतिवादींना मान्य नाही, कबूल नाही.

१५) वादीचे दावा कलम ४ मधील मजकुर की, " दावा कलम १अ मध्ये वर्णन केलेली मिळकत हिचा पुर्वीचा गट नंबर १८०३/२ क्षेत्र ३ हे ३७ आर याची चतुर्सिमा पुर्वेस शिव दक्षिणेस १८०५ पश्चिमेस १८०४ उत्तरेस १८०३/१ अशी आहे. ही मिळकत वादी यांचे वडिल हेमराज जसराज भळगट यांनी दि.२ सप्टेंबर १९७७ रोजी लक्ष्मण आप्पाजी सोनवणे यांचे कडुन कायम खरेदीखताने घेतलेली होती व आहे. सदरची मिळकत खरेदी घेतांना जिरायत होती त्यामध्ये वादी यांचे वडिल हेमराज जसराज भळगट यांनी विहीर खोदुन इले.मोटार व पाईपलाईन केलेली आहे. सदरची मिळकत ही हेमराज जसराज भळगट यांची स्वत: उत्पन्नातुन खरेदी केलेली आहे. व सदरची मिळकत ही वादी यांना देण्यात आलेली आहे." हा संपूर्ण मजकूर खोटा व बनावट असुन तो या प्रतिवादींना मान्य नाही, कबूल नाही.

१६) वादीचे दावा कलम ५ मधील मजकुर की, " दावा कलम १ब मध्ये वर्णन केलेली मिळकत ५८३/२/ब हिचा पुर्वीचा गट नंबर १८०३/१ असा असुन पुर्वेला शिव दक्षिणेस १८०३/२ पश्चिमेस १८०४ उत्तरेस १८०२ अशी असुन सदरची मिळकत ही प्रतिवादी नं.१ धनराज भळगट व त्याचे भाऊ प्रेमराज भळगट यांनी ८/२/१९८० रोजी खरेदी घेतली होती व आहे. दरम्यानचे काळात सन १९८२ मध्ये वादी, वादीचे वडिल, प्रतिवादी नं.१, प्रेमराज भळगट, यांच्यात वाटप झाले. सदरचे वाटपाप्रमाणे वादी यांना गट नंबर १८०३/१ मध्ये १ हे ६८ आर वादी यांचे वडिल हेमराज भळगट यांना गट नं.१८०३ क्षेत्र १ हे ६९ आर, नंतर प्रतिवादी नं.१ धनराज भळगट यांना गट नं.१८०३ क्षेत्र १ हे ६९ आर व प्रेमराज भळगट नं.१८०४ मध्ये १ हे ६९ आर असे वाटप झाल्याचे दिसून येत आहे. सदर दाव्यातील वादी यांनी ता.५/१२/२००३ रोजी त्याचे वडिल हेमराज भळगट यांना गट नंबर

१८०३/१ पैकी ० हे ५६ आर पुर्वेकडील व तसेच गट नंबर १८०३/१ पैकी ० हे ५६ आर धनराज भळगट यांना पश्चिमेकडील क्षेत्र फेर नं. २०४६८ व २०४६९ प्रमाणे विकल्याचे दिसून येत आहे. परंतु सदरचे वाटपात कोणत्याही प्रकारची दिशा ठरलेली नव्हती व नाही परंतु त्या प्रमाणे फेर नं.४१९० अन्वये ७/१२ उताऱ्यास नोंद झाली त्यानंतर सन २०११ मध्ये वादीचे वडिल हेमराज भळगट, प्रतिवादी नं.१ व प्रेमराज भळगट यांचे मयत वारस कांचनबाई भळगट यांच्यात वाटप झाल्याचे दिसुन येत आहे. त्या वाटपा प्रमाणे हेमराज भळगट (वादीचे वडील) यांना १८०३/१ मध्ये ० हे ८४ आर व तसेच १८०३/२ मध्ये १ हे ६९ आर व तसेच प्रतिवादी नं.१ यास १८०३/३ मध्ये १ हे ६९ आर व तसेच गट नं.१८०३/१ मध्ये ० हे ८४ आर, प्रेमराज भळगट यांना गट १८०३/४ क्षेत्र १ हे ६९ आर असे क्षेत्र वाटपाने दिल्याचे दिसुन येत आहे. परंतु सदर वाटपाप्रमाणे वादी यांचे वडिल, प्रतिवादी नं.१ व तसेच प्रतिवादी नं.१ चे भाऊ प्रेमराज भळगट यांच्यात कधीही प्रत्यक्ष कब्जेवहिवाट झाल्याची दिसुन येत नाही. दरम्यानचे काळात गट नंबर १८०३/२ व गट नं.१८०३/१ चे गट नंबर ५८३/१ व ५८३/२, ५८३/३ व ५८३/४ असे विभाजन झालेले आहे. " हा संपूर्ण मजकूर खोटा व बनावट असुन तो या प्रतिवादींना मान्य नाही, कबूल नाही.

१७) वादीचे दावा कलम ६ मधील मजकुर की, " वास्तविक पाहता सदर गट नंबर १८०३/२ याचे कब्जे वहिवाट वादी ता.२ सप्टेंबर १९७७ चे खरेदीखता पमाणे करीत असून सदर मिळकती मध्ये वादी यांचे वडिलांनी विहीर, पाईपलाईन व वस्ती स्वत: केलेली आहे. सदर विहीर पाईपलाईन वस्तीशी प्रतिवादी नं.१ याचा काहीएक संबंध नाही असे असतांना सदर दाव्यातील

प्रतिवादी नं.१ यांनी दावा कलम १ब गट नं.५८३/२/ब क्षेत्र २ हे ५३ आर ही मिळकत सदर दाव्यातील प्रतिवादी नं.२ व ३ यांना कायम स्वरुपी विकण्याचे ठरविले असुन व त्या प्रमाणे त्यांच्यात आपसात करार झाल्याचे दिसून येत आहे. सदर दाव्यातील प्रतिवादी नं.२ व ३ यांनी दे.सार्वमत दि.१३/११/२०२४ रोजीचे ॲड.सुनिल बी.गडाख यांचे मार्फत जाहीर नोटीस दिली. व सदरची नोटीस वादी यांचे वाचण्यात आंली. वास्तविक पाहता सदर दाव्यातील प्रतिवादी नं.१ यांचा दावा कलम १ब मध्ये वर्णन केलेल्या मिळकतीशी कधीही कब्जे वहिवाट नव्हतीं व नाही तसेच विहीर व पाईपलाईन मध्ये प्रतिवादी नं.१ यांचा कधीही हक्क हितसंबंध नसतांना प्रतिवादी नं.१ यांनी पोकळीस्त नोंदीच्या आधार प्रतिवादी नं.२ व ३ यांना विक्री करण्याचे ठरविले वादी याने दि.१४/११/२०२४ रोजी प्रतिवादी नं.१ घरी जावुन विनंती की, जमिनीचे रेकॉर्ड दुरुस्त झाल्यावर विक्री करा त्यावेळी प्रतिवादी नं.१ याने वादीचे विनंती कडे दुर्लक्ष केले म्हणुन प्रतिवादी नं.१ यांनी दाव्यात वर्णन केलेल्या मिळकतीचे कोणत्याही तिऱ्हाईत इसमांस हस्तांतर करु नये असा निरंतर ताकीद मनाई हुकूमासाठी दावा सदर दाव्यातील प्रतिवादी नं.१ व तसेच प्रतिवादी नं.२ व ३ यांचे पती एकनाथ केरु वांढेकर व आण्णासाहेब रामदास आदमाने तसेच कल्पना राजेंद्र कटारिया यांचे विरुध्द दाखल केला होता त्याचा दावा नं.१०६७/२०२४ असून सदर दाव्यात प्रतिवादी नं.१ यांनी हजर होवून कैफियत दिली. दरम्यानचे काळात मा.कोर्टाने सदर दाव्यातील प्रतिवादी नं.१ विरुध्द आहे ती परिस्थिती कायम ठेवण्याचा हुकूम पुढील तारखे पर्यत केला होता. परंतु काही तांत्रिक कारणामुळे सदरचा हुकूम रद्द झाल्यानंतर सदर प्रतिवादी नं.१ याने प्रतिवादी नं.२ व ३ यांना तारीख २०/०१/२०२५

रोजी बेकायदेशिर खरेदीखत केले. वास्तविक पाहता सदर प्रतिवादी नं.१ यांचा दावा कलम १ब मध्ये नमुद केल्या प्रमाणे कधीही कब्जा वहिवाट नव्हती व नाही परंतु प्रतिवादी नं.१ याने भुमि अभिलेख नेवासा यांना हाताशी धरुन दावा कलम मध्ये वर्णन केलेल्या मिळकतीशी बेकायदेशिर फाळणी केली व त्या प्रमाणे फेरफार नं.३२०१३ नुसार सदर दावा कलम १अ व १ब असे नविन ७/१२ उतारे तयार झाले. परंतु त्या प्रमाणे सदर दाव्यातील प्रतिवादी नं.१ यांची कधीही कब्जे वहिवाट नव्हती व नाही. सदर दावा मिळकतीचे फाळणीचे संदर्भात प्रथम माहिती वादी यास प्रतिवादी नं.१ याने रे.मु.नं.१०७६/२०२४ मध्ये दिलेल्या कैफियतीत नमुद केल्या नंतर समजले. सदर दाव्यातील वादी यांचे वडिल हेमराज भळगट व प्रतिवादी नं.१ हे सख्खे भाऊ होते वादी यांचे वडिल हेमराज जसराज भळगट यांचे मृत्युसमई वय ८३ वर्षाचे होते व त्यांचा मृत्यु सन २०१९ मध्ये झाला. मृत्युपुर्वी ते वयस्कर असल्याने सतत आजारी असल्याचे व त्यांना व्यवहाराचे व आपण काय करतो याची समज त्यांना होत नसत त्याचा गैरफायदा घेवुन सदर दाव्यातील प्रतिवादी नं.१ याने भुमि अभिलेख नेवासा यांना हाताशी धरुन दावा मिळकतीचे बेकायदेशिर फाळणी करुन बेकायदेशीर वाद निर्माण केला याची माहिती वादीस नुकतीच झाली असुन वादी त्याबाबत योग्य ती पुढील कायदेशीर कार्यवाही करणार आहे." हा संपूर्ण मजकूर खोटा व बनावट असुन तो या प्रतिवादींना मान्य नाही, कबूल नाही. सदर कलम ६ मधील केवळ ॲड.एस.बी.गडाख यांचे मार्फत दै.सार्वमत या वृत्तपत्रात दि.१३/११/२०२४ रोजी दिलेली जाहिर नोटीसीबाबचा मजकुर खरा आहे, इतर सदर कलममधील संपुर्ण मजकुर हे प्रतिवादी नाकारीत आहेत.

१८) वादीचे दावा कलम ७ मधील मजकुर की, "सदर दाव्यातील प्रतिवादी नं.१ याने दावा कलम १ मध्ये वर्णन केलेल्या बेकायदेशीर रित्या २०/०१/२०२५ रोजी प्रतिवादी नं.१ यांनी प्रतिवादी नं.२ व ३ यांना करुन दिलेल्या खरेदीखत तसेच प्रतिवादी .१ याने मो र. न.१८४/२०१७ चा पोट हिस्सा मोजणी बेकायदेशीर करुन बेकायदेशीर फाळणी केली. म्हणुन सदर दाव्यातील वादी याने सदर दावा प्रतिवादी नं.१ ते ३ यांचे विरुध्द प्रतिवादी नं.१ याने प्रतिवादी नं.२ व ३ यांना करुन दिलेले दि.२०/०१/२०२५ रोजी करुन दिलेले खरेदीखत हे वादीवर बंधनकारक राहु नये असा जाहिर ठराव होवुन मिळावा तसेच सदर दावा कलम १ब मध्ये वर्णन केलेली मिळकत वादी आणि प्रतिवादी १ कडे बाजार भावा प्रमाणे अग्रहक्काने खरेदी करण्यास तयार असणे बाबत व साक्षीदार समक्ष विनंती केली परंतु प्रतिवादी याने वादीस तु माझ्या विरध्द दावा केला असल्याने मी तुला बाजार भावाप्रमाणे खरेदी देणार नाही तु माझे काहीएक वाकडे करु शकत नाही,मी तुला जमिनीतुन काढून देईल अशी धमकी दि.१५/०१/२०२५ रोजी दिली व त्यानंतर प्रतिवादी नं.१ याने प्रतिवादी नं.२ व ३ यांना नियमाप्रमाणे बाजारभावाप्रमाणे खरेदी घेण्यास तयार असल्याचे विनंती करुन देखील वादीचा दावा मिळकत खरेदी घेण्याचा कायदेशीर हक्क व अधिकार असतांना देखील सदरची दावा कलम १ब ही मिळकत प्रतिवादी नं.२ व ३ यांना ता.२०/०१/२०२५ रोजी बेकायदेशिर विक्री केली. वादी याचे दावा मिळकती कोणीही हरकत अडथळा करु नये असा निरतर ताकीद मनाई हुकूमासाठी तसेच प्रतिवादी नं.१ याने मो.र नं.१८४/२०१७ चे केलेले फाळणी हे बेकायदेशिर ठरवुन सदरची फाळणी वादीवर बंधनकारक राहु नये असा जाहिर ठराव होवून मिळवा म्हणून सदरचा दावा प्रतिवादी विरुध्द

जाहिर ठराव निरंतर ताकीद मनाई हुकूमासाठी दाखल करणे भाग पडले आहे. " हा संपूर्ण मजकूर खोटा व बनावट असुन तो या प्रतिवादींना मान्य नाही, कबूल नाही.

१९) वादीचे दावा कलम ८ मधील मजकुर की, " सदर प्रतिवादी नं.४ ही आजरोजी दाव्यात सही करण्यास हजर नसल्याने तिला वादीपणात सामिल केलेले आहे. तिच्या विरुध्द वादीला काहीएक मागणे नाही." हा संपूर्ण मजकूर खोटा व बनावट असुन तो या प्रतिवादींना मान्य नाही, कबूल नाही.

२०) वादीचे दावा कलम ९ मध्ये दिलेले दाव्याचे कारण हे खोटे व लबाडीचे असुन त्याप्रमाणे काही एक दाव्यास कारण घडलेले नाही. वादींचा दावा विनाकारण असलेने खर्चासह रद्द होणेस पात्र आहे.

२१) वादीने वादीच्या दावा कलम १३ मध्ये व मनाई अर्जात केलेल्या विनंत्या खोट्या असुन त्या विनंत्या मान्य करण्यालायक नसुन कायद्यातील तरतुदी अन्वये योग्य व कायदेशीर नसल्याने त्या मान्य करता येणार नाही. त्यामुळे वादीने केलेल्या विनंत्या हा प्रतिवादी सक्तरितीने नाकारीत आहे.

२२) <u>वास्तविक पाहता खरी परिस्थिती अशी आहे की,</u> वादी हा प्रतिवादी नं.१ यांचा सख्ख्या भावाचा मुलगा म्हणजेच पुतण्या आहे. वादीने प्रस्तुतचा दावा हा केवळ वादीने भाऊकीतील द्वेषापोटी दाखल केलेला आहे. सदर वादी हा नेहमीच हया प्रतिवादी यांना आर्थिक लाभापोटी ब्लॅकमेल करु पाहत असतो. सदर प्रतिवादी नं.१ हे अत्यंत वयस्कर आहे, त्यांचे वय ८० वर्षापेक्षा जास्त आहे, ते नेहमी आजारी असतात, त्यांना एकमेव मुलगा पंकज असुन तो बाहेरगावी वास्तव्यास आहे. तसेच या प्रतिवादी नं.१ यांचा दुसरा एक मुलगा होता, त्याचा नऊ-दहा वर्षापुर्वी आकस्मित मृत्यु झालेला

Assistant Su Criminal C

आहे. या प्रतिवादी नं.१ यांची पत्नी देखील वयस्कर असुन आजारी असते. सदरचे प्रतिवादी नं.१ व त्यांची पत्नी हे दोघेच सोनई येथे राहतात, त्यांना कोणाचाही आधार नाही, अश्या परिस्थितीचा गैरफायदा घेवून वादी हे त्यांना नेहमी ब्लॅकमेल करु पाहतात, त्यांना शिवीगाळ करतात व त्यांचे नावे असलेली शेतजमिन ही बेकायदेशिररित्या बळकविण्याचा प्रयत्नात आहेत.

२३) सदर प्र.वादी नं.१ यांना आजारपण, औषधोपचार तसेच स्वत:च्या दैनंदिन गरजा लोकांची आर्थिक देणे देण्याकरीता मोठी आर्थिक गरज असल्यामुळे त्यांनी त्यांचे स्वतंत्र अश्या हिस्स्याची मालकी हक्क कब्जाची व ताब्यातील वहिवाटीत असलेली शेतजमिन मौजे सोनई (नविन),ता.नेवासा येथील गट नं.५८३/२/ब, क्षेत्र २ हे.५३ आर या मिळकतीशिवाय कुठलेही उपजिवीकेचे साधन त्यांचेकडे नसल्याने प्रस्तुतची मिळकत त्यांनी त्यांचे आर्थिक गरजेकरीता विक्रीस काढली असता वादी याने अभिलाषा बुध्दीने प्रतिवादी नं.१ हा केवळ आपला चुलता आहे, वयस्कर आहे, प्र.वादीचा मुलगा हा गरीब स्वभावाचा आहे, त्याला कोणाचाही आधार नाही. याचा गैरफायदा घेवून सदरची मिळकत ही गिंळकृत करता यावी म्हणून प्रस्तुतचा खोटया स्वरुपाचा दावा वादीने मे.कोर्टासमोर दाखल केलेला आहे.

२४) प्रस्तुत दावा मिळकती पैकी मौजे सोनई (नविन) येथील दाव्यात नमुद दावा मिळकत वर्णन कलम १ब गट नं.५८३/२/ब , क्षेत्र २ हे.५३ आर ही मिळकत प्रतिवादी नं.१ यांची स्वतंत्र मालकी हक्क कब्जेवहिवाटीची मिळकत होती व आहे. सदरची मिळकत ही त्यांना वाटपानुसार स्वतंत्ररित्या मिळालेली आहे. त्यांची स्वतंत्र वहिवाट आहे. प्रतिवादी नं.१ ही स्वतंत्ररित्या शेतजमिनीची वहिवाट करुन उत्पन्न उपभोग घेतात, त्यांची अव्याहतपणे वरील मिळकतीवर मालकी कब्जा व वहिवाट आहे. सदरच्या मिळकतीमध्ये

Superintendent
Newase

या वादीचा अगर इतर कुणाचाही काहीएक हितसंबंध हक्क अधिकार, कब्जा नव्हता व नाही.

२५) सदर वादीचा स्वतंत्र असा मौजे सोनई येथील गट नं.५८३/२/अ, क्षेत्र २ हे.५३ आर असे क्षेत्र स्वतंत्ररित्या वादी व त्यांची सख्खी बहिण प्रतिवादी नं.४ यांच्या नावावर आहे. त्यांची स्वतंत्ररित्या सदर क्षेत्रावर मालकी हक्क वहिवाट आहे. वादी व प्र.वादी नं.१ यांचा व दावा मिळकत १अ व १ब बाबत एकमेकांशी काहीएक संबध नाही. वादीने केवळ दोन्ही मिळकती ह्या एका दाव्यात गुंतागुंत निर्माण करुन मे.कोर्टाची दिशाभुल करता यावी यां उद्देशाने समाविष्ट केलेल्या आहेत.

२६) वादी व प्र.वादी नं.१ व ४ यांचे पुर्वीची वंशावळी बाबतचा खुलासा असा आहे की, प्र.वादी नं.१ धनराज, हेमराज व प्रेमराज असे तिन सख्खे भाऊ होते. वादी हा हेमराज यांचा मुलगा आहे, हेमराज व प्रेमराज हे दोघेही मयत आहेत. असे असतांना सन १९७७ मध्ये प्र.वादी नं.१ धनराज, हेमराज व प्रेमराज यांचे तिघांचे एकत्र कुटूंब होते. सदर दावा मिळकत ही या तिन भावांनी मुळ जमिन मालक लक्ष्मण आप्पाजी सोनवणे व इतर यांचेकडून खरेदी केलेली मिळकत आहे. सदरची संपुर्ण दावा मिळकत ही प्र.वादी नं.१ धनराज, हेमराज व प्रेमराज यांनी एकत्रात सन १९७७ मध्ये हेमराज याचे नावे ३ हे.३७ आर व सन १९८० मध्ये प्र.वादी नं.१ धनराज व प्रेमराज यांचे नावे सामाईकात ३ हे.३८ आर विकत घेतलेली होती व आहे. अश्या प्रकारे संपुर्ण तिन भावाच्या एकत्र कुटूंबामध्ये ६ हे.७५ आर अशी एकत्रित मिळकत होती. त्यावेळी संपुर्ण एकत्र कुटूंब असल्यामुळे एकत्रात मेहनत मशागत करुन सर्व उत्पन्न उपभोग घेत होते. सदर शेतजमिनीचा या तिन भावांनी एकत्रीतरित्या सदरची मिळकतीमध्ये अनेक सुधारणा केल्या,

त्यामध्ये शेतीसाठी लागणाऱ्या पाण्याच्या सुविधेकरीता तिन भावांनी त्यांचे एकत्रित उत्पन्नातुन एक विहीर खोदली. त्या विहीरीवर इले.मोटार बसविण्यात आलेली आहे, तसेच पाईपलाईन केलेली आहे. सदर विहीरीवरील इलेक्ट्रीक कनेक्शन घेण्यात आलेले आहे, सदरचे कनेक्शन हे त्यावेळी प्र.वादी नं.१ चे नावावर घेण्यात आलेले आहे, ते आजही कनेक्शन चालु स्थितीत आहे.

२७) अशी परिस्थिती असतांना सन १९८२ मध्ये वादीचे वडिल हेमराज हे सर्वात मोठे बंधु होते. त्यांचा मुलगा वादी अनिल हा देखील मोठा असल्यामुळे एकत्र कुटूंबातील व्यवहार त्यास समजु लागले. सदरचे व्यवहार समजु लागल्यामुळे  व वादीचे वडील हे कुटूंबातील आर्थिक कारभार पाहतात याचा गैरफायदा घेवून वादी हा एकत्र कुटूंबातील पैसे घेवून तो आडदांड व नंगट गुन्हेगारी प्रवृत्तीचा असल्यामुळे तो गुन्हेगारी लोकांत वावरत असे व एकत्र कुटूंबातील पैश्याचा वापर चैन विलासाचे जीवन जगणेकामी खर्च करु लागला व कुटूंबामध्ये चुलते प्र.वादी नं.१ व मयत प्रेमराज यांना दमदाटी करु लागला तसेच स्वत:च्या वडिलांना देखील दमदाटी करुन पैसे घेवून त्याचा दुरुपयोग करु लागला. त्यामुळे कुटूंबामध्ये कलह निर्माण झ ााला.

२८) त्यामुळे सन १९८२ मध्ये प्र.वादी नं.१ धनराज, हेमराज, प्रेमराज या तिन भावांमध्ये व हेमराज यांचा मुलगा वादी यांचे दरम्यान मा.तहसिलदार नेवासा यांचेकडे जमिन महसुल अधिनियम कलम ८५ प्रमाणे वाटप झाले व त्या वाटपानुसार हेमराज यांचे हिश्यास १ हे.६९ आर, प्रेमराज यांचे हिश्यास १ हे.६९ आर व प्र.वादी नं.१ धनराज यांचे हिश्यास १ हे.६९ आर याप्रमाणे तिन भावांना समान हिश्याप्रमाणे वाटपात क्षेत्र देण्यात आले.

परंतु, सदरच्या वाटपामध्ये वादी अनिल यांचे वडिलांना त्यांचा योग्य तो कायदेशिर हिस्सा दिलेला असतांना देखील वादी अनिल यांनी प्रेमराज व धनराज यांना दमदाटी करुन बळजबरीने त्यांचे प्रमाणेच स्वत:ला देखील एक हिस्सा प्रस्तुतच्या वाटपामध्ये घेतलेला आहे. त्यावेळी अनिल यांचे नावे १ हे.६८ आर क्षेत्र सन १९८२ साली जादा देण्यात आले. प्रस्तुतचे वाटप मा.तहसिलदार नेवासा यांचेकडील आदेश वाटप/एस.आर/१५४/८२ दि.२०/०९/१९८२ नुसार झाले व त्यानुसार त्याची नोंद गावचे रेकॉर्ड ऑफ राईटला फेरफार नं.४१९० अन्वये झालेली आहे. त्या वाटपानुसार तीन भाऊ व अनिल यांचे स्वतंत्र हिस्से वहिवाट निर्माण झाली व त्याप्रमाणे जो-तो त्याचे क्षेत्राची प्रत्यक्ष वहिवाट करुन उत्पन्न घेवू लागले.

२९) त्यानंतर दि.०७/१०/२००३ रोजी वादी अनिल याने स्वत:चे चैन विलासा करीता त्याचे नावे असलेली मिळकत तिऱ्हाईतांस विक्री करु पाहू लागला. त्यावेळी अनिल याचे नावे असलेले १ हे.६८ आर क्षेत्रापैकी हेमराज यांनी ० हे.५६ आर पुर्वेकडील क्षेत्र दि.०७/१०/२००३ रोजी खरेदीखताने घेतलेले आहे. त्याच वेळी वादी अनिल याचे नावावरील क्षेत्रापैकी प्र.वादी नं.१ धनराज यांनी ० हे.५६ आर पश्चिमेकडील क्षेत्र कायमखरेदी दस्त क्रं.३३१९/२००३ नुसार घेतलेले आहे. तसेच त्याच वेळी वादी अनिल याचे नावावरील उर्वरित मधले ० हे.५६ आर हे हेमराज व प्र.वादी नं.१ धनराज यांनी कायमखरेदी दस्तान्वये खरेदी केलेले आहे व खरेदीखतातील नमुद चतुर्सिमेप्रमाणे प्रत्यक्ष ताबा देखील या प्र.वादी नं.१ यास दिलेला आहे. अश्या प्रकारे वादी अनिल याने त्याचे नावावरील संपुर्ण क्षेत्र हे कायदेशिररित्या प्र.वादी नं.१ यांना विक्री केलेले आहे, त्यामुळे वादी यांचा मालकी हक्क संपुष्टात आलेला आहे.

३०) अश्याप्रकारे प्र.वादी नं.१ यांना त्यांचे सन १९८२ सालचे वाटपानुसार आलेले १ हे.६९ आर + खरेदी घेतलेले ० हे.५६ आर + दुसऱ्या सामाईक खरेदीखतातील १/२ हिस्सा म्हणजे ० हे.२८ आर क्षेत्र असे एकूण २ हे.५३ आर क्षेत्र हे प्रतिवादी नं.१ यांचे प्रत्यक्ष मालकी हक्क कब्जेवहिवाटीचे आहे. वास्तविक पाहता वादी अनिल यांनी प्रतिवादीस खरेदीखतामध्ये दिशा नमुद करुन क्षेत्र विक्री केलेले आहे. त्या चतुर्सिमेप्रमाणे अव्याहतपणे खरेदी घेतलेल्या दिनांकापासून प्र.वादी नं.१ यांची कब्जेवहिवाट मालकी हक्काने होती व आहे.

३१) सदर प्रतिवादी नं.१ धनराज यांनी त्यांचे नावे असलेल्या मिळकतीबाबतचा स्वतंत्ररित्या पोटहिस्सा फाळणी होवून मिळणेकामी मा.उपअधिक्षक भुमिअभिलेख नेवासा यांचे सन २०१७ मध्ये अर्ज दाखल केला, त्यास वादीचे वडील हेमराज यांनी देखील ते हयात असतांना संमती दर्शविलेली होती, त्यानुसार वादीचे वडिल हेमराज व प्र.वादी नं.१ धनराज यांच्या दोघांच्या सहमतीने मा.उपअधिक्षक भुमिअभिलेख नेवासा यांनी त्यास मो.र.नं.१८४/२०१७, ता.१०/०२/२०१७ देवून पुर्वीचा मौजे सोनई येथील गट न.५८३/२, एकुण क्षेत्र ५ हे.०६ आर .या गटाची मोजणी दि.२२/०२/२०१७ रोजी करुन पोटहिस्सा फाळणी अन्वये केलेली आहे. त्याप्रमाणे वादीचे वडिल हेमराज यांचे नावावरील असलेल्या क्षेत्राचा ग.नं.५८३/२/अ, क्षेत्र २ हे.५३ आर याचा स्वतंत्र गट निर्माण झालेला आहे व प्र.वादी नं.१ धनराज यांचे नावावरील असलेल्या क्षेत्राचा गट नं.५८३/२/ब, क्षेत्र २ हे.५३ आर याचा स्वतंत्र गट निर्माण झालेला आहे आणि त्या स्वतंत्र पोटहिस्सा फाळणी करुन दोन कायदेशिर स्वतंत्र हिस्से व गट निर्माण झालेले आहेत, त्या गटाप्रमाणे या प्र.वादी नं.१ यांची मालकी

हक्क कब्जा व वहिवाट ही ग.नं.५८३/२/ब प्रमाणे आजतागायत आहे व तसेच ग.नं.५८३/२/अ या स्वतंत्र फाळणी बाराचे नकाशाप्रमाणे वादीची मालकी हक्क, वहिवाट आहे.

३२) वादी हा जाणीवपुर्वक हेतुपरस्कर, लालसेपोटी प्रतिवादी नं.१ ते ३ यांना ब्लॅकमेल करण्याच्या उद्देशाने मो.र.नं.१८४/२०१७ चे फाळणी बाराच्या मोजणीबाबत खोटी विधाने कथने करुन मे.कोर्टाची दिशाभुल करुन बेकायदेशिररित्या प्रतिवादी नं.१ ते ३ यांची दावा मिळकत हडप करण्याच्या प्रयत्नात आहे व त्या आधारे वादी प्रतिवादी नं.१ ते ३ यांना ब्लॅकमेल करत आहे.

३३) सदर प्रतिवादी नं.१ यांची सन १९८२ पासून आजतागायत मालकी हक्काने कब्जावहिवाट गटामध्ये फाळणी बाराचे नकाशाप्रमाणे पुर्व बाजुने आहे. तसेच त्याचे मालकीचे क्षेत्रात त्यांनी शेती अवजारे व शेतीमालासाठी दोन पत्र्याच्या खोल्या व एक पत्र्याचे शेड तयार केलेले आहे ते प्र.वादी नं.१ चे स्वतंत्र मालकीचे आहे. तसेच त्यामध्ये एक सामाईक विहीर आहे, सदरचे विहीरीचे पाणी वापरण्याचा हक्क, अधिकार हा वादी व प्रतिवादी नं.१ यांना समान हिश्याने पुर्वापार असा आहे. सदर विहीरीवरुन या प्रतिवादीचे नावे असलेल्या व ताब्यात असलेल्या गटातील असलेल्या क्षेत्रामध्ये शेती करीता विहीरीवरुन पाईपलाईन केलेली आहे. सदरची पाईपलाईन ही सन १९८२ सालचे वाटपापुर्वी केलेली आहे. तसेच पाईपलाईनचा वापर वादी व प्र.वादी नं.१ यांचा समान हिश्याप्रमाणे आहे. सदर विहीरीवरील इलेक्ट्रीक कनेक्शन हे प्र.वादी नं.१ धनराज यांचे नावे आहे. तसेच वादीच्या नावावरील मिळकतीमध्ये त्याचा स्वतंत्र एक बोअरवेल आहे. तसेच या

प्र.वादी नं.१ यांचा देखील त्याचे मिळकतीमध्ये एक स्वतंत्र बोअरवेल आहे. येणेप्रमाणे सत्य वस्तुस्थिती अशी आहे.

३४) वादीचा दावा पाहता वादीने दावा कलम ३ मध्ये प्र.वादी नं.१ यांच्या ताब्यात ग.नं.५८३/२/ब ही मिळकत वहिवाटीस आहे, असे मान्य केलेले आहे. तसेच वादीचा दावा हा मोघम व्हेग स्वरुपाचा असा आहे. त्यामुळे वादीचा दावा हा Hopless & Bard by Law असा आहे. सबब वादीचा दावा रद्द होण्यास पात्र आहे.

३५) प्रस्तुत दावा मिळकत प्रतिवादी नं.१ यांनी विक्रीस काढल्याची माहिती वादीस झाल्यानंतर वादीने मे.न्यायालयातमध्ये रे.मु.नं.१०७६/२०२४ चा दावा खोटा बनावट दाखल केलेला होता. सदरच्या दाव्यामध्ये मे.कोर्टाने एकतर्फा स्टेटस-को चा आदेश पारित केलेला होता. प्रतिवादी हे हजर झाल्यानंतर मे.कोर्टाने स्टेटस-को चा आदेश रद्द केला. त्यानंतर प्रस्तुत दाव्यातील दावा मिळकत १ब - ग.नं.५८३/२/ब, क्षेत्र २ हे.५३ आर ही संपुर्ण मिळकत ही दरम्यानच्या काळामध्ये प्रतिवादी नं.१ यांना पैश्यांची अत्यंत गरज असल्यामुळे व त्यांना सोईस्कर अशी गुंतवणूक करण्यासाठी,लोकांची देणी देण्याकरीता, कर्ज भरण्याकरीता पैश्याची आवश्यकता असल्यामुळे सदरची मिळकत ही प्र.वादी नं.१ यांनी प्रतिवादी नं.२ व ३ यांनी दि.२०/०१/२०२५ रोजी कायमखरेदीखत दस्त क्रं.३३४/२०२५ व कायमखरेदीखत दस्त क्रं.३३५/२०२५ या दोन खरेदीखतान्वये मालकी हक्काने विक्री केलेली आहे. तेंव्हापासुन सदर मिळकतीवर प्र.वादी नं.१ व २ यांची मालकी हक्काने कब्जेवहिवाट निर्माण झालेली आहे. प्र.वादी नं.२ व ३ हे सदर मिळकतीचे अव्याहतपणे मालक व

कब्जेदार झालेले आहेत. त्यांचा ताबा आजरोजी मो.र.नं.१८४/२०१७ चे फाळणी नकाशाप्रमाणे पुर्व बाजुकडून असा आहे.

३६) वादीने दाव्यात दावा कलम १३ मध्ये तसेच नि.नं.५ व नि.१३ वरील केलेल्या विनंत्या हया बेकायदेशिर असुन वादीची कोणतीही विनंती मान्य करण्यात येवू नये.

३७) वादीने प्र.वादी नं.१ ते ३ यांना विनाकारण आर्थिक व मानसिक त्रास देण्यासाठी, प्र.वादी नं.१ हे वयस्करपणाचा गैरफायदा घेण्यासाठी, आर्थिक फायदयासाठी तसेच त्यांना त्याच्या न्यायहक्कापासून वचित ठेवण्याच्या उद्देशाने वादीने जाणीवपुर्वक प्रस्तुतचा खोटा व बनावट दावा दाखल केलेला आहे.

३८) सदरील वादी यांना प्रथमदर्शनी केस नाही, न्यायाचा समतोलपणाही वादीचे बाजुने नाही. मनाई हुकूम न दिल्यास सदरील वादी यांचे कोणतेही नुकसान होणार नाही.

Assistant Criminal

३९) अशी सर्व परिस्थिती असताना वादीने या प्रतिवादींना त्रास देण्यासाठी जाणीवपूर्वक खोटा दावा, खोटा मनाई हुकूमाचा अर्ज खोटे ॲफिडेव्हिट करुन या प्रतिवादींना निष्कारण खर्चात पाडले म्हणून या प्रतिवादींना वादीकडून रक्कम रु. ५०,०००/- रुपये कॉम्पेनसेटरी कॉस्ट देण्याचा हुकूम या व्हावा.

४०) सदर प्रतिवादी नं.१ ते ३ यांना वादी व त्याचे कुटूंबीय हे दावा मिळकत गट नं.५८३/२/ब, क्षेत्र २ हे.५३ आर या मिळकतीचे मालकी हक्क कब्जेवहिवाटीस, उत्पन्न उपभोगास बेकायदेशिररित्या हरकत अडथळे करत आहेत. त्यामुळे प्रतिवादी हे लवकरच आवश्यक कागदपत्रे, माहिती, पुरावा घेवून सविस्तर असा या दाव्यास प्रतिदावा न्यायहक्कासाठी कायदेशिर

संपुर्ण मागणीसह दाखल करणार आहेत, त्यास मे.कोर्टाची परवानगी असावी, तसेच प्रतिदावा दाखल करण्याचा हक्क राखुन प्रस्तुतची कैफियत प्र.वादी नं.१ ते ३ आजरोजी देत आहेत.

४१) येणेप्रमाणे वरील संपूर्ण कायदेशीर मुद्यांचा, वस्तुस्थितीचा विचार करुन या माननिय कोर्टाने वादीचा सदरचा दावा आणि मनाई हुकूमाचा अर्ज खर्चासहीत रद्द करावा, आणि या प्रतिवादींना त्यांचा खर्च मिळावा, ही विनंती.

४२) प्र.वादी नं.१ ते ३ यांना काही जुन्या कागदपत्रे व माहिती अभावी कैफियतीमध्ये नमुद करणे राहुन गेल्यास ज्यादा कैफियत देण्याची अथवा कैफियत दुरुस्त करण्याची परवानगी असावी.

येणेप्रमाणे ॲफिडेव्हिट केले असे.

नेवासा

दिनांक :- २३/०५/२०२५

ॲफिडेव्हिट करणार

ओळख

(ॲड.एस.बी.लवांडे)

याकामी मी प्रतिवादी नं.१ धनराज जसराज भळगट, वय-७६, धंदा-शेती, रा.सोनई, ता.नेवासा, जि.अ.नगर सत्यप्रतिज्ञेवर खरे सांगतो की, वर नमूद केलेला कैफियत कलम १ ते ४२ मधील संपूर्ण मजकूर हा माझ्या माहिती व सांगणेप्रमाणे खरा व बरोबर असून त्याचे सत्यतेसाठी मी आज रोजी माझी सही या लेखाखाली केली असे.

नेवासा

दिनांक :- २३/०५/२०२५

ॲफिडेव्हिट करणार

...emnly affirmed before me by Dhanraj Jasraj Bhalgat Age 76 occ Agri R/o Sonai Newasa
who is identified before me by Adv S B Lawande
whom I personally know
Asstt. Superintendent